रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २४९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ शनिवार, २८ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

कर्जत नगर परिषद अभय योजनेला मुदतवाढ/२
नवी मुंबईत अनधिकृत बांधकामांवर हातोडा/६
रायगड जिल्हा कबड्डी संघांच्या सराव शिबिराला प्रारंभ/८

## ‘भारतात पुरेसा इंधनसाठा, लॉकडाऊन लागणार नाही’



**मुंबई :** मध्यपूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात कोविड काळाप्रमाणे लॉकडाऊन लागेल, अशा अफवा सोशल मीडियावरून व्हायरल होत आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक देशांमध्ये शटडाऊनसारखी परिस्थिती असली, तरी भारतात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही. देशाकडे किमान एक महिना पुरेल इतका इंधनसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याच मुद्द्यावर केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री हरदीप सिंह पुरी यांनीही सरकारचा लॉकडाऊन लागू करण्याचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

# राजिपचा २३५ कोटींचा अर्थसंकल्प

## महसुली बजेट दुपटीने वाढले; विविध तरतुदी

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**



रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२५-२६चा १७५ कोटी ७७ लाख रुपयांचा अंतिम सुधारित अर्थसंकल्प तसेच २०२६-२७चा मूळ महसूली १७५ कोटी ७५ लाख २२ हजार रुपये व भांडवली ६० कोटी ५० लाख रुपये असा एकूण २३५ कोटी ९१ लाख २१ हजार रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी शुक्रवारी (दि. २७) सभेत सादर केला. तो मंजूर करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवनातील सभागृहात विशेष सभा झाली. या सभेत त्यांनी अर्थसंकल्प सादर केला. उपाध्यक्ष मधुकर पाटील, समाजकल्याण सभापती नारायण डामसे, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, सभापती वैकुंठ पाटील, चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे तसेच सर्व विभागप्रमुख या सभेला उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचा २०२५-२६चा मूळ महसूली अर्थसंकल्प ८५ कोटी ८५ लाख रुपयांचा होता. तो सुधारित १७५ कोटी ७७ लाख रुपयांचा झाला. मागील वर्षाच्या महसूली मूळ अर्थसंकल्पापेक्षा यंदाच्या अर्थसंकल्पात सुमारे दुपटीने वाढ झाली आहे. महसुली व भांडवली असा एकूण २३५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. रायगडच्या इतिहासात पहिल्यांदाच इतका मोठा मूळ महसूली अर्थसंकल्प मांडण्यात आला.

यंदाच्या अर्थसंकल्पात प्रशासनासाठी १० कोटी ४८ लाख ८८ हजार, सामान्य प्रशासनासाठी १७ कोटी ८३ लाख, विषय समित्यांसाठी पाच लाख ४० हजार, शिक्षण विभागासाठी ११ कोटी ३३ लाख ८२ हजार, इमारत व दळणवळणासाठी ३६ कोटी ७१ लाख ७९ हजार, पाटबंधारे विभागासाठी सात कोटी ३५ लाख ८१ हजार, सार्वजनिक आरोग्यासाठी पाच कोटी १० लाख ९९ हजार, सार्वजनिक आरोग्य देखभाल दुरूस्तीसाठी २६ कोटी ७० लाख २९ हजार, कृषी विभागासाठी चार कोटी ४७ लाख सहा हजार, पशुसंवर्धन विभागासाठी चार कोटी १० लाख, जंगलांसाठी १० लाख, समाजकल्याण ३१ कोटी ३५ लाख २८ हजार, दिव्यांग सक्षमीकरणासाठी सात कोटी ८३ लाख, महिला व बालकल्याण १५ कोटी ६७ लाख ६४ हजार, निवृत्तीवेतन सहा लाख, सामान्य प्रशासन सहा कोटी ४१ लाख ४२ हजार, ग्रामपंचायत चार कोटी ९८ लाख ८६ हजार, समाजकल्याण सात लाख, अर्थ विभाग दोन कोटी ९५ लाख अशी तरतूद करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांना शंभर टक्के विद्युत जोडणी व वायफाय सुविधा करून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यासाठी १५ लाख रुपये, शिवपुण्यतिथीसाठी प्रथमच पाच लाख रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे तसेच शिवराज्याभिषेक व शिवपुण्यतिथी कार्यक्रमाकरिता पाणीपुरवठा करण्यास ३० लाख रुपये तरतूद आहे. रायगड परिसर व शिवरायांच्या विविध समारंभांकरिता एकूण ७० लाख रुपये इतकी तरतूद केली आहे.

अर्थसंकल्पात महिला सक्षमीकरण, दिव्यांग सक्षमीकरण, मागासवर्गीय कल्याण, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता, कृषी, ग्रामीण पायाभूत सुविधा यांना प्राधान्य देण्यात आले आहे. अंगणवाड्यांमधील बालकांना गणवेश पुरविण्यासाठी दोन कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महिला बचत गटांना मधुमक्षिका पालन किट पुरविण्यासाठी ३० लाख रुपये देण्यात येणार आहेत. प्राथमिक शाळांमधील मुलींकरिता सॅनिटरी नॅपकीन पुरविण्याची योजना राबविण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरविण्याची योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी दोन कोटी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढविण्यासाठी स्वतंत्र कर संकलन प्रणाली विकसित करण्यासाठी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. (पान २ वर..)

### अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

- *विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना रायगडरत्न पुरस्कार*
- *जिल्हा परिषदेतील शाळांमधील विद्यार्थ्यांना ई-लर्निंग सुविधा*
- *ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढविण्यासाठी स्वतंत्र कर संकलन प्रणाली*
- *ग्रामीण भागातील भजनी मंडळांना साहित्य संच*
- *महिला बचत गटांना मधुमक्षिका पालन किट*
- *सर्व अंगणवाड्यांना शंभर टक्के विद्युत जोडणी*
- *रायगड परिसर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध समारंभांकरिता एकूण ७० लाख रुपये तरतूद*
- *सर्व मागसवर्गीय वस्त्यांमध्ये रस्ते, साकव होणार*
- *चवदार तळे सत्याग्रह सोहळा साजरा करण्यासाठी तरतुद*



## जनतेला दिलेला शब्द पूर्ण करणे हेच आमचे प्रमुख कर्तव्य -आमदार प्रशांत ठाकूर

### ■ पनवेलमध्ये लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाची आतापर्यंतची जी वाटचाल राहिली आहे, त्यात केवळ निवडणूक जिंकणे हे आमचे तत्व किंवा उद्देश कधीच राहिला नाही, तर निवडणुकीच्या माध्यमातून जनतेला दिलेला शब्द आणि अभिवचने पूर्ण करणे हेच आमचे प्रमुख काम आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी सत्कार समारंभात केले.



अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ आणि पनवेल महापालिका शिक्षण विभागाच्या वतीने नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार समारंभ पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक नाट्यगृहात शुक्रवारी (दि. २७) आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

या सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम आणि पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, एखादी व्यक्ती पदावर किती काळ आहे, यापेक्षा त्या पदावर राहून त्याने लोकहिताची काय कामे केली यावरूनच त्याचे यश मोजले जाते. या कसोटीवर माझे सर्व सहाकरी आपल्या सर्वांच्या शुभेच्छांच्या आधारे यशस्वी होतील, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाला भाजप जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, महापालिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सोपान चांदे, सरचिटणीस विनोद जोशी आदींसह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### लडाखमध्ये हिमस्खलनात सात जणांचा मृत्यू, पाच जखमी

**लेह :** लडाखमधील जोजिला भागात श्रीनगर-लेह महामार्गावर झालेल्या भीषण हिमस्खलनात सात जणांचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. हिमस्खलनाचा फटका वाहनांनादेखील बसला. अनेक वाहने कमी-अधिक प्रमाणात बर्फात अडकली आहेत, तर हिमस्खलनामुळे महामार्गच बंद झाला. यानंतर प्रशासनाने एक बचाव अभियान हाती घेतले. मशीन्सचा वापर करून बर्फ हटवण्याचे काम सुरू आहे.

### केंद्रीय आंतर-मंत्रालयीन उच्चस्तरीय गटाची स्थापना

**नवी दिल्ली :** इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पश्चिम आशियातील या तणावामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सरकारने आंतर-मंत्रालयीन गट (आयएमजी) स्थापन केला आहे. या गटाचे नेतृत्व संरक्षणमंत्री राजनाथ सिंह करणार असून गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि पेट्रोलियममंत्री हरदीप सिंह पुरी यांच्यासह इतर महत्त्वाच्या मंत्रालयांचे प्रतिनिधी सहभागी आहेत.

## ..तर मंत्री नरहरी झिरवळ यांच्यावर कारवाई होणार -मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवळ यांचे काही व्हिडीओ बाहेर आले असून त्याची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. आता जे काही व्हिडीओ बाहेर आले आहेत ते गंभीर आहेत. ते व्हिडीओ खरे असतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होईलच, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

मंत्री नरहरी झिरवळ यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाल्याने नवा वादंग निर्माण झाला आहे. याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, जे व्हिडीओ बाहेर आले त्यांची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. या संदर्भात मंत्री झिरवळ यांनी आपल्याशी दूरध्वनीवरून संपर्क केला असून व्हायरल झालेला व्हिडीओ हा तीन-चार व्हिडिओ एकत्र जोडून चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आल्याचे सांगितले तसेच त्याची चौकशीची व्हावी असेही म्हणाले. त्यावर, त्यांनी या संदर्भात तक्रार दाखल करावी, असा सल्ला आपण त्यांना दिल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या व्हिडीओची शहानिशा करण्यात येईल, असे सांगतानाच सध्या जी परिस्थिती समोर आली आहे त्यानंतर या व्हिडीओची सत्यता काय आहे, ती पडताळून पाहिली जाईल. मग त्यांच्या पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार आणि आम्ही मिळून योग्य निर्णय करू, मात्र आता जे काही व्हिडिओ समोर आले आहेत ते गंभीर आहेत. त्यामुळे त्याची सत्यता पडताळणे अत्यंत गरजेचे आहे. आणि ते जर सत्य असतील तर त्याच्यावर योग्य ते कारवाई होईलच, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यात मानवी जीवनाचे खरे समाधान -लोकनेते रामशेठ ठाकूर

### स्वछंद सामाजिक विकास संस्थेतर्फे विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपण जेव्हा दुसऱ्यासाठी काम करतो, तेव्हाच आपल्या जीवनात खरा आनंद निर्माण होतो. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यात आणि त्यांना आनंद देण्यातच मानवी जीवनाचे खरे समाधान सामावलेले आहे, असे उद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे स्वछंद सामाजिक विकास संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात काढले.



स्वछंद सामाजिक विकास संस्थेच्या वतीने रामनवमी उत्सवाचे औचित्य साधून नवीन पनवेल येथील हनुमान मंदिरात गुरुवारी चैत्र हळदी-कुंकू समारंभ, सामूहिक रामरक्षा आणि मारुती स्तोत्र पठणाचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे स्वागत करत संस्थेच्या वतीने अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करताना संस्थेने आपले हे सेवाव्रत भविष्यातही असेच अविरत सुरू ठेवावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे स्वछंद सामाजिक विकास संस्थेच्या नवीन लोगोचे अनावरण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्याच हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेने एक स्तुत्य उपक्रम जाहीर केला असून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून पनवेल महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मोफत संस्कार भारती रांगोळी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. संस्थेच्या या सामाजिक बांधिलकीबद्दल आणि उपक्रमाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाधान व्यक्त करत संस्थेचे आभार मानले.

कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, नगरसेविका डॉ. प्रियांका कांडपिळे, डॉ. अस्मिता घरत, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुशीला घरत, सुहासिनी शिवणेकर, गुलाब थवई, कृपेश कांडपिळे, स्वराली कांडपिळे, मंदिर कमिटी अध्यक्ष रवींद्र कांडपिळे, खजिनदार उमेश मोरे, कमिटी उपाध्यक्ष अनिल लोंढे, स्वच्छंद सामाजिक विकास संस्था सहकारी कमिटीच्या अध्यक्ष नीता घाटुगडे, सचिव सुलभा मोरे, कार्याध्यक्ष संध्या भुजबळ, माया देसाई, अंकिता पारकर यांच्यासह पदाधिकारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## २०११पर्यंतची शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे होणार नियमित

### राज्य सरकारचा निर्णय; जीआर जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २०११पर्यंत झालेली व सध्या केवळ निवासासाठी अस्तित्वात असलेली शासकीय जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला.

या निर्णयानुसार या आदेशानुसार ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात येणार आहे, तर उर्वरित क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ दहा टक्के रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारली जाईल.

नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान किंवा शाळा, रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा बाधित कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेतून पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तथापि, हा निर्णय मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण राज्यासाठी लागू आहे. त्याचबरोबर कोणत्याही परिस्थितीत भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही. असे अतिक्रमण आढळल्यास पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## आजपासून आयपीएल ‘रन’संग्राम

### बंगळुरू-हैदराबाद संघांमध्ये सलामीची लढत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

ज्याची वर्षभरापासून क्रिकेट चाहते आतुरतेने वाट बघत असतात तो आयपीएलचा कुंभमेळा शनिवार (दि. २८)पासून सुरू होत आहे. क्रिकेटच्या या ‘रन’संग्रामाची सुरुवात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद यांच्या सामन्याने होणार आहे. तब्बल दोन महिने आयपीएलचा थरार अनुभवता येणार आहे.

रजत पाटीदारच्या नेतृत्वात बंगळुरू संघाने गेल्या वर्षी पहिल्यांदाच आयपीएलचे विजेतेपद पटकावले होते. पहिल्या ट्रॉफीसाठी आरसीबी संघाला तब्बल १७ वर्षे वाट बघावी लागली. यंदा आयपीएलची ट्रॉफी डिफेंड करण्यासाठी आरसीबीचा संघ मैदानात उतरणार आहे. पहिल्याच सामन्यात आरसीबीचा सामना सनरायझर्स हैदराबादसोबत होणार आहे. सध्या हैदराबाद संघ धाकड असल्याचे मानले जात आहे, तर आरसीबीचा संघही तुल्यबळ आहे.



आयपीएलचा पहिलाच सामना बंगळुरूत संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल. त्याच्या अर्धा तास आधी म्हणजेच संध्याकाळी ७ वाजता नाणेफेक होईल. आयपीएलमधील बहुतांश सामने हे संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होऊन रात्री उशिरापर्यंत संपतील.

### इथे पाहता येतील सामने

अनेक वर्षांपासून आयपीएल सामन्यांच्या लाइव्ह टेलिकास्टचे अधिकार स्टार स्पोर्ट्सकडे आहेत. यंदाही हे अधिकार स्टार स्पोर्ट्सकडेच आहेत. हा सामना टीव्हीवर लाइव्ह बघायचा असेल, तर स्टार स्पोर्ट्सवर जाऊन सामन्याचा थरार अनुभवता येईल. मोबाईलवर जियो हॉट स्टारवर हे सामने लाइव्ह बघता येतील आणि स्मार्ट टीव्हीवर जियो हॉट स्टारवर जाऊन खेळ पाहता येईल.

## पेणच्या भोगावती नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथील भोगावती नदीपात्रात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वसीम शेख (वय २०, रा. सागर सोसायटी, पेण) असे या तरुणाचे नाव आहे.



वसिम शेख हा गुरुवारी (दि.२६) दुपारच्या सुमारास मित्रांबरोबर भोगावती नदीशेजारी व्हॉलीबॉल खेळत होता. त्यावेळी बॉल अचानक पिंपळडोह येथील नदीपात्रात गेल्याने वसिम तो आणायला गेला, मात्र पाण्याचा प्रवाह व खोलीचा अंदाज न आल्याने तो नदीपात्रात बुडाला. यावेळी मित्रांनी व ग्रामस्थांनी ही माहिती कळवल्यावर पोलीस घटनास्थळी पोहचले तसेच नगर परिषद आपत्ती व्यव्यवस्थापन पथकाच्या साहाय्याने शोधमोहीम राबविण्यात आली, पण सायंकाळपर्यंत वासिम सापडला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी हेल्थ फाउंडेशन खोपोली व एसव्हीआरएसएस रेस्क्यू टीम यांच्यामार्फत शोधमोहीम राबविण्यात आली. तेव्हा वसिमचा मृतदेह हा नदीपात्रातील कपारीत आढळून आला. शवविच्छेदनसाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून वसिमच्या मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# राज्यात लॉकडाऊन अजिबात लागणार नाही -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात इंधन आणि गॅसचा तुटवडा आहे, म्हणून आता राज्यात कोविड काळाप्रमाणे लॉकडाऊन लागेल अशा अफवा सोशल मीडियावरून व्हायरल होत आहेत. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांमध्ये उत्तर दिलं आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी इशारा देताना म्हटले की, लॉकडाऊन किंवा इंधन तुटवड्याबाबत खोट्या अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. अगदी फेक व्हॉट्सअॅप मेसेज फॉरवर्ड करणे देखील गुन्हा ठरू शकतो, त्यामुळे नागरिकांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहन त्यांनी केले.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक देशांमध्ये 'शटडाऊन'सारखी परिस्थिती असली, तरी भारतात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही. देशाकडे किमान एक महिना पुरेल इतका इंधनसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याच मुद्द्यावर केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायूमंत्री हरदीप सिंह पुरी यांनीही नागरिकांना अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. सरकारचा लॉकडाऊन लागू करण्याचा कोणताही विचार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, संकटाच्या काळात संयम बाळगणे गरजेचे असून अफवा पसरवणे देशासाठी घातक ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले.


एकूणच, सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे की देशात इंधन तुटवडा किंवा लॉकडाऊनची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांपासून सावध राहून अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा.

### इंधन दरांबाबत दिलासा

दरम्यान, केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात मोठी कपात केली आहे. पेट्रोलवरील शुल्क ₹13 वरून ₹3 पर्यंत कमी करण्यात आले असून, डिझेलवरील ₹10 प्रति लिटर उत्पादन शुल्क पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे. यामुळे वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींचा भार सर्वसामान्यांवर पडणार नाही, अशी माहिती देण्यात आली.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी शौचालय बंद

**श्रीवर्धन : बातमीदार**



श्रीवर्धन शहरातील समुद्रकिनारी मठाचा गवंड येथे श्रीवर्धन नगर परिषदेने जवळजवळ ३५ लाख रुपये निधी खर्च करून अत्यंत सुसज्ज असे ऍस्पिरेशनल पद्धतीचे स्नानगृह व शौचालय बांधले आहे, परंतु श्रीवर्धन नगर परिषद प्रशासनाला सदरचे शौचालय सुरू करण्यासाठी अद्याप मुहूर्त सापडत नसल्याबद्दल नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

प्रत्येक शनिवारी व रविवारी श्रीवर्धन शहर पर्यटकांनी तुडुंब भरून जाते. यानंतर एप्रिल महिन्यात शाळेच्या सुट्ट्या संपल्यानंतर पाऊस पडे पर्यंत पर्यटकांचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरू राहील. अशावेळी सदरचे शौचालय सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. हे स्वच्छतागृह सुरू नसल्याने येणारे पर्यटक जवळपास असलेल्या हॉटेल व रिसॉर्ट्स मालकांकडे कपडे बदलण्यासाठी व आंघोळीसाठी जाण्याबाबत विचारणा करताना दिसून येतात. संपूर्ण श्रीवर्धन शहरामध्ये सार्वजनिक मुतारी किंवा सार्वजनिक शौचालयाची कुठेही व्यवस्था नाही. तालुक्याच्या ग्रामीण भागातून दिवसा असंख्य नागरिक आपल्या विविध कामांसाठी श्रीवर्धन शहरात येत असतात.

या सर्वांना शौचालयाची व सार्वजनिक मुतारीची सोय नसल्यामुळे मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. याबाबत श्रीवर्धन नगरपरिषदेला या अगोदरदेखील अनेक निवेदने दिलेली आहेत. परंतु याबाबत नगर परिषदेकडून कारवाई करण्यात येत नाही. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने सदरचे स्वच्छतागृह लवकरात लवकर सुरू करण्यासाठी कारवाई करावी. अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून होत आहे.

**सदरचे स्वच्छतागृह सुरू करण्यासाठी आम्ही माणूस शोधत आहोत. लवकरच त्या ठिकाणी एका माणसाची नेमणूक करून स्वच्छतागृहाची योग्य प्रकारे स्वच्छता केली जाईल व त्याचा देखभालीचा देखील प्रश्न सदर व्यक्तीने पहावयाचा असेल अशी व्यक्ती सापडल्यानंतर त्वरित स्वच्छतागृह सुरू करण्यात येईल.**
**-विराज लबडे, मुख्याधिकारी,**
श्रीवर्धन नगर परिषद, श्रीवर्धन

# जेएनपीटी पोलीस ठाण्याजवळ ट्रेलरच्या धडकेत रिक्षाचालक ठार

**उरण : वार्ताहर**

जेएनपीटी पोलीस ठाण्याजवळ पुलाखाली गुरुवारी सायंकाळ च्या सुमारास एक भीषण अपघात घडला. ओव्हरलोड असलेल्या कंटेनर टेलरने रिक्षाला दिलेल्या जोरदार धडकेत जसखार येथील रिक्षा चालक किसन सुकीर ठाकूर याचा जागीच चिरडून दुर्दैवी मृत्यू झाला.

धक्कादायक म्हणजे पुढील महिन्यात ठाकूर यांच्या मुलीचे लग्न आहे. अशातच काळाने घातलेल्या या घालामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्रत्यक्षदर्शनी दिलेल्या माहितीनुसार पुलावरून उतरत असताना एका भरधाव कंटेनर टेलरवरील चालकाचा ताबा सुटला. या टेलरने पुढे जात असलेल्या रिक्षाला इतकी भीषण धडक दिली की रिक्षासमोर उभे असलेल्या दुसऱ्या एका टेलर खाली घुसून पूर्णपणे चिरडले गेली .अपघाताचे स्वरूप इतके भयानक होते. की रिक्षाचा अक्षरशः चंदामेंदा झाला. सुदैवाने रिक्षामध्ये इतर प्रवासी नसल्याने मोठी जीवित हानी टळली. चालक किसन ठाकूर यांना प्राण गमवावे लागले.

या अपघाता मागे ट्रेलरवर क्षमतेपेक्षा जास्त (दोन कंटेनर) लोड असल्याचे प्राथमिक कारण समोर येत आहे. बंदरातून नियमांचे उल्लंघन करून ओव्हरलोड गाड्या सोडल्या जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. तसेच अनेक चालक तासंनतास विश्रांतीशिवाय वाहन चालवत असल्याने थकव्यामुळे त्यांचे नियंत्रण सुटत आहे. अनेक चालकांकडे वैध परवाना नसणे, किंवा बोगस परवाने वापरले जाणे, ही बाब ही आता ऐरणीवर आली आहे.

न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांनी दिलेल्या माहितीनुसार अपघातानंतर ट्रेलर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. संबंधित ट्रान्सपोर्ट मालक परराज्यातील असल्याने त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मालक हजर झाल्यानंतर अधिक माहिती स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले.

# एकविरा देवीच्या पालखी सोहळ्यात हाणामारी



**खालापूर : प्रतिनिधी**

कार्ला येथील कुलस्वामिनी आई एकविरा देवीचा चैत्री यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात झाला. दिवसभर भाविकांच्या अलोट गर्दीने आणि भक्तीमय वातावरणाने कार्ला गड दुमदुमून गेला होता, मात्र मुख्य पालखी सोहळा झाल्यानंतर रात्रीच्या सुमारास दोन गटांत झालेल्या हाणामारीमुळे या उत्सवाला गालबोट लागले आहे.

देवीचा मुख्य पालखी सोहळा आणि विश्वस्त मंडळाने केलेले नियोजन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले होते, मात्र पालखी पुढे नेण्यावरुन दोन गटांत हाणामारी झाल्याने यात्रा सोहळ्याळा गालबोट लागले. रात्री १० वाजेच्या सुमारास पायथा मंदिराच्या आवारात पनवेल आणि कल्याण येथील दोन गटांमध्ये वाद झाला. 'पालखी पुढे नेण्याच्या' कारणावरून हा वाद विकोपाला गेला आणि त्याचे रूपांतर थेट हाणामारीत झाले. हा वाद इतका वाढला की दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक करण्यास सुरुवात केली. या अचानक झालेल्या राड्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेत पाच जण जखमी झाले असून त्यांच्यावर लोणावळा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे दगडफेक शिवीगाळ हाणामारी यांनी परीसरात भितीचे वातावरण पसरले होते. घटनास्थळी पुणे पोलिसांतील वरीष्ठ पोलीस अधिकारी दाखल झाले असून जादा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# ऑनलाईन शेअर खरेदीच्या माध्यमातून फसवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील बेलंतरा सोसायटी कराडे खुर्द येथील उत्तम रामदास बांगर (वय ४३, व्यवसाय नोकरी) याची ऑनलाईन शेअर खरेदीच्या माध्यमातून ८ लाख ३० हजार रूपयाची फसवणूक झाल्याची घटना घडली असून रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी उत्तम बांगर याला गोल्डन बुल अलायन्स या ग्रुपवर लिंकद्वारे जॉईन झाला. त्यानंतर फिर्यादी उत्तम बांगर यांना बँक अकाऊंट नंबर पाठवून त्यावर रक्कम पाठविण्यास सांगितले. पाठविलेले पैसे उत्तम बांगर यांच्या वेबलिंक अकाऊंटवर पाठवून त्या पैशाचे शेअर खरेदी करून त्यातून उत्तम बांगर यांना नफा झाल्याचे भासवले व त्यांचा विश्वास संपादन केला.

उत्तम बांगर यांनी अधिक नफा हवा असल्यास अधिक पैसे जमा करा असे सांगून वेगवेगळ्या बँकेच्या खात्यामध्ये त्यांना रक्कम पाठविण्यास सांगितले. ती रक्कम वेबलिंक अकाऊंटवर पाठविले असल्याचे भासवून तुम्हाला शेअर मार्केटमध्ये नफा झाल्याचे सांगितले, परंतु नफा झालेली रक्कम उत्तम बांगर यांच्या खात्यावर आली नाही व ती रक्कम खात्यामध्ये वर्ग झाली नाही.

यावरून वेबलिंक अकाउंटवर दिसत असलेला नफा दाखवून फिर्यादी उत्तम बांगर यांचा विश्वास निर्माण करून आठ लाख ३० हजाराची फसवणूक केली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात इंडसिंड बँक अकाऊंट नाव स्काय होम एंटरप्रायझेस, बँक ऑफ महाराष्ट्र, राजधानी मेडिको आणि बंधन बँक श्री बालाजी सोल्युशन या बँकेच्या खातेधारकांनी फसवणूक केली असून रसायनी पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६५ (ड) नुसार दाखल करण्यात आले असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पवार अधिक तपास करीत आहेत.

# कर्जत नगर परिषद अभय योजनेला मार्च अखेरपर्यंत मुदतवाढ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेमध्ये शास्ती माफ करून कर वसुली करणाऱ्या अभय योजनेला १६ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र आता या योजनेला ३१ मार्च २०२६ पर्यंत आज झालेल्या नगर परिषदेच्या सर्व साधारण सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली.

कर्जत नगर परिषदेची सर्वसाधारण सभा २७ मार्च रोजी सभागृहात नगराध्यक्षा पुष्पा दगडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. उपनगराध्यक्ष संतोष पाटील, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, नगरसेवक सुवर्णा जोशी, अशोक राऊत, महेंद्र चंदन, सुचिता खोत, सुमिता गायकवाड, अंजली कडू, प्रशांत पाटील, मानसी कानिटकर, राधिका पवार, कुमेश मोरे, नेहा शिंदे, संकेत भासे, विजय हजारे, कोयल कन्हेरीकर, रामदास गायकवाड, किशोर कदम, अरुणा वायकर, जान्हवी देवघरे, वैभव सुरावकर, राजेश कोठारी, रोहित ओसवाल उपस्थित होते.

सुरुवातीला ९ मार्च २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात आले. त्यानंतर परिपत्रकाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर नगरसेवक तथा बांधकाम सभापती महेंद्र चंदन यांनी शास्ती माफ करून कर वसुली करणाऱ्या अभय योजनेला मुदतवाढ द्यावी. असे निवेदन दिलेल्या विषयावर चर्चा झाली. त्यानंतर या योजनेला ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

# मुरूडमध्ये उद्या नेत्रचिकित्सा शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

मनोरमा नेत्रालय मुलुंड (पश्चिम) मुंबई आणि रघुनाथ नेत्रालय प्रभादेवी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य नेत्रचिकित्सा व शस्त्रक्रिया शिबिर अंजनाबाई पुंडलिकराव लहाने हेल्थ अॅन्ड केअर सेंटर, मुरुड-जंजिरा येथे रविवार, २९ मार्च २०२६रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि नेत्रतज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रतज्ञ डॉ. रागिणी पारेख, रॅटीना तज्ञ डॉ. सायली वाघमारे तसेच डोळ्यांचे कॅन्सर सर्जन डॉ. सुमित लहाने व त्यांचे सहकारी डॉक्टरांचे उपस्थितीत हे शिबिर होणार आहे.

इच्छुकांनी संजीवनी आरोग्य केंद्रात नावे नोंदवावीत, असे आवाहन कार्याध्यक्ष विजय सुर्वे यांनी केले आहे.

# रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्करपदी प्रा. किशोर पाटील

**कळंबोली : बातमीदार**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथील ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक प्रा. किशोर सुरेश पाटील यांची रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर पदावर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातून अन मान्यवरण कडून हार्दिक अभिनंदनचा वर्षाव केला जात आहे.



महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक इतिहासात रयत शिक्षण संस्थेचे स्थान अत्यंत अनन्यसाधारण व प्रेरणादायी आहे. या संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले येथे केली. १९१९ साली लावलेले ज्ञानाचे रोपटे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे.

सध्या महाराष्ट्रातील १५ व कर्नाटकातील १ अशा एकूण १६ जिल्ह्यांमध्ये संस्थेच्या विविध शाखांद्वारे पूर्व-प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षण दिले जाते. प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे आणि आश्रमशाळा अशा एकूण ७४२ शाखां आहेत.

अशा प्रतिष्ठित आणि व्यापक कार्य करणाऱ्या संस्थेत लाईफ वर्कर म्हणून निवड होणे ही अत्यंत अभिमानाची व गौरवाची बाब आहे. प्रा. किशोर पाटील यांच्या या निवडीबद्दल रायगड विभागाचे चेअरमन बाळाराम पाटील, ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर, प्राचार्य बबन साळुंखे, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# कर्जतमध्ये रामनवमीनिमित्त शोभायात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील श्री राधाकृष्ण व मारुती मंदिर सेवा संस्थानच्या वतीने रामनवमी निमित्त सकाळी विविध धार्मिक समारंभ करण्यात आले. दुपारी श्री राम जन्मोत्सव सोहळा करण्यात आला. त्यानंतर कर्जत शहरातून शोभायात्रा काढण्यात आली.

श्री राम मंदिरात सकाळी आरती, त्यानंतर भजन, दुपारी १२ वाजता श्री राम जन्म सोहळा करण्यात आला. त्यानंतर पाळणा व आरती करण्यात आली. सायंकाळी सहा वाजता शीव तांडव ढोल पथकाच्या तालावर शोभायात्रा काढण्यात आली. त्यानंतर महा आरती करण्यात येऊन महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली.

यावेळी किरण ठाकरे, नगरसेवक महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल, शिवलाल गुप्ता, शिवसेवक गुप्ता, उमाशंकर गुप्ता, अमित गुप्ता, भाऊ दिवेकर, शिव किशोर गुप्ता, प्रमोद गुप्ता, अजय पाल, किशोर ठाकरे, जयेश ठाकरे, पंछी गुप्ता, नितीन गुप्ता आदी उपस्थित होते.



**पान १ वरुन**

## राजिपचा २३५ कोटींचा अर्थसंकल्प

एकही मागसवर्गीय वस्ती रस्ते किंवा साकवपासून वंचित राहणार नाही यासाठी आमचे प्रयत्न आहेत. जिल्हा परिषदेतील शाळांमधील विद्यार्थ्यांना ई-लर्निंग सुविधा, शाळांना एलईडी संच, सीसीटीव्ही, स्वच्छतागृहे देण्यात येतील. समतेचे प्रतीक असलेल्या महाड येथील चवदार तळे सत्याग्रहास यंदा १०० वर्षे पूर्ण होत असल्यामुळे हा सोहळा साजरा करण्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना रायगडरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल, असे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जाहीर केले.

# नेपाळच्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील पुरस्कारांचे मोहोपाडा रिस येथे वितरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नेपाळमधील लुम्बिनी येथे भारतीय स्वयंसेवि संस्था महासंघ (इंडिया) यांच्या वतीने 'भारतीय समानता' या विषयावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली.

या परिषदेत भारतातील विविध राज्यांतील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था व कार्यकर्त्यांना मानाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले होते, मात्र जे कार्यकर्ते काही कारणास्तव नेपाळला जाऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी रायगड जिल्ह्यातील सम्यक सामाजिक संस्था, रिस-मोहोपाडा यांच्या वतीने गुरुवारी (दि.२६) विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ. गोरख साठे आणि सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाशजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी एन. एम. वाघमारे सर आणि पनवेल येथील मान्यवर उपस्थित होते.

# ताग उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री

**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय ताग क्षेत्रात ताग गिरण्या आणि मोठ्या संख्येने लघु व सूक्ष्म युनिट्सचा समावेश आहे. भारत हा कच्च्या तागाचा आणि तागाच्या वस्तूंची जगातील सर्वात मोठा उत्पादक आहे. तागाने 'पोत्यां'पासून 'सुसंस्कृतपणा'पर्यंत एक मोठा प्रवास केला आहे. आज काही विविध तागाची उत्पादने (जेडीपी) जाणकारांचीही पसंती बनली आहेत. आपल्या प्रचारात्मक उपक्रमांचा एक भाग म्हणून, एनजेबी 'ज्यूट फेअर नागपूर'चे आयोजन करण्यात आले होते.



ज्यामध्ये पर्यावरणपूरक, जीवनशैलीला पूरक अशा तागाच्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री यांचा समावेश आहे. कर्नाटक, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल इत्यादींसह देशाच्या विविध भागांतील सुमारे २० सूक्ष्म ताग उद्योजक / स्वयं-सहायता गट / स्वयंसेवी संस्था / सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) ताग युनिट्स त्यांची पर्यावरणपूरक तागाची ग्राहक उत्पादने जसे की तागाच्या हस्तकला वस्तू, तागाच्या भेटवस्तू व नाविन्यपूर्ण वस्तू, फॅन्सी तागाच्या पिशव्या, तागाच्या खरेदीच्या पिशव्या, तागाचे वॉल हँगिंग्ज, गृहवस्त्रे, तागाची पादत्राणे, तागाच्या चटया आणि सतरंज्या इत्यादींचे प्रदर्शन करतील. ताग उद्योजकांना स्टॉल्स विनामूल्य दिले जात आहेत. सर्वसामान्य अभ्यागतांकडून कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली मकरंद क्षीरसागर यांनी, २६ ते ३० मार्च २०२६ दरम्यान सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया), नागपूर लोकल सेंटर, नागपूर येथे आयोजित होणाऱ्या 'ज्यूट फेअर नागपूर'चे उद्घाटन करण्यास सहर्ष संमती दिली आहे.

## दुखवटा

### प्रभावती कामेरकर



**माणगाव :** तालुक्यातील प्रसिद्ध सर्जन डॉ. संतोष कामेरकर यांच्या मातोश्री कैलासवासी प्रभावती भास्कर कामेरकर (वय ९३) यांचे गुरुवार, १९ मार्च रोजी निधन झाले आहे. भावकी सागेसोयरे, गावकी, मित्र परिवार त्यांच्या अंत्य यात्रेत शोकाकुल परिस्थितीमध्ये सहभागी झाले होते. कै. प्रभावती कामेरकर यांचे दशक्रियाविधी निजामपूर येथे शनिवार, २८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता करण्यात येतील. त्यांचे बाराव्याचे विधी ३० मार्च व त्यांचे तेरावे विधी ३१ मार्च रोजी मंगळवारी त्यांच्या राहत्या घरी होणार आहेत.

## निवडक

### पनवेलमधून दुचाकीची चोरी

**पनवेल :** शहरातील साईलिला बिल्डींग लाईफलाईन हॉस्पिटलच्या पाठीमागे एक उभी करून ठेवलेली युनीकॉर्न मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. विनायक भोसले यांनी त्यांची ४० हजार रुपये, एक होन्डा कंपनीची युनीकॉर्न मोटरसायकल (एमएच ४३ बी८१५७) ही काळ्या रंगाची असून ती पनवेल शहरातील साईलिला बिल्डींग लाईफलाईन हॉस्पिटलच्या पाठीमागे एक उभी करून ठेवली होती. याचवेळी ही स्कूटी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### 'अंनिस'तर्फे आज कविसंमेलन

**मोहोपाडा, रसायनी :** फेब्रुवारी २०२६ मध्ये जाहीर केल्याप्रमाणे महाराष्ट्र अंनिस शाखा मोहोपाडा-रसायनीचे कविसंमेलन रविवार २९ मार्च२०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ०१ वा.वेळेत जेष्ठ कवी आणि कोमसापचे विश्वस्त प्रा.एल.बी.पाटील यांचे अध्यक्षतेखाली होणार असल्याचे महा.अंनिस शाखा मोहोपाडाच्या कार्याध्यक्षा माधुरी कांबळे व सांस्कृतिक अभिव्यक्ती कार्यवाह रोहिदास कवळे यांनी कळविले आहे. संबंधित कवींना फोन/ई-मेलवरून कळविणेत आले आहे. कवी संमेलन श्रीकृष्ण मंदिर सभागृह, अपूर्वा हॉटेलजवळ, गणेशनगर चांभार्ली ता.खालापूर, जि.रायगड येथे होणार आहे.

# खारघरमध्ये अनधिकृत आईस्क्रिम गाड्या जप्त

## पनवेल महापालिकेची धडक मोहीम






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' अंतर्गत अतिक्रमण विभागाच्या वतीने खारघर येथे नुकतीच अतिक्रमण विभागाच्या वतीने कारवाई करून हिरानंदानी येथील मार्जिनल स्पेस मोकळा करण्यात आला. तसेच अनधिकृत आईस्क्रीम-फालुदा विक्री करणाऱ्या सहा गाड्या जप्त करण्यात आल्या.

खारघर शहरात विविध ठिकाणी अनधिकृत आईस्क्रीम -फालुदा विक्री होत असल्याचे दिसून येत आल्याने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या आईस्क्रीम -फालुदा विक्री करणाऱ्या गाड्यांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने नुकतीच जप्तीची कारवाई करण्यात आली.

यामध्ये सेक्टर ७,१२, १८, १९ अशा विविध सेक्टर मध्ये अनधिकृत आईस्क्रीम -फालुदा विक्री करणाऱ्या ६ गाड्या जप्त करण्यात आल्या. याबरोबर हिरानंदानी सेक्टर १५ येथील फतुश शॉप समोर १५ स्टील स्टूल जप्त करण्यात आले. तसेच सेक्टर ७ हिरानंदानी येथे टेबल जप्त करण्यात आले.

कारवाईदरम्यान माननीय अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रुपाली माने, अधीक्षक जितेंद्र मढवी, १० सुरक्षा रक्षक, अतिक्रमण पथक उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने अशा प्रकारच्या अनधिकृत अतिक्रमणांवरती पुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## रामनवमीनिमित्त नवीन पनवेलमध्ये हिंदू संमेलन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामनवमीच्या शुभमुहूर्तावर सकल हिंदू समाजाच्या वतीने नवीन पनवेल येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयात गुरुवारी (दि.२६) हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या संमेलनाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आणि प्रभू श्रीरामाचे आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. या सोहळ्याला पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ, अजय बहिरा, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, राजेश भुजबळ आदी उपस्थित होते. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित या संमेलनाच्या माध्यमातून हिंदू संस्कृती आणि एकात्मतेचे दर्शन घडले.

## भोंदूबाबा अशोक खरातची पनवेलच्या शिरढोण गावातही जमीन खरेदी

**पनवेल : वार्ताहर**

भोंदूगिरीच्या माध्यमातून कोट्यवधींची संपत्ती उभारल्याचा आरोप असलेल्या अशोक खरात याच्या कथित आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे आता पनवेल तालुक्यातील शिरढोण गावापर्यंत पोहचल्याचा धक्कादायक खुलासा समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खरातने काळ्या पैशांची गुंतवणूक करण्यासाठी पनवेल जवळच्या शिरढोण गावातील जमिनी मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याचे आरोप होत आहेत. विशेष म्हणजे या जमिनी थेट त्याच्या नावावर न घेता नातेवाईकांच्या नावावर घेतल्याचे समोर आले असून, संबंधित सातबारा नोंदीतही त्याची नोंद असल्याची माहिती आहे. या व्यवहारांमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याची चर्चा असून, या निधीचा स्रोत संशयास्पद असल्याचा आरोप केला जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, हे व्यवहार अत्यंत वेगाने पूर्ण करण्यात आले. यामध्ये महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनी नियमांना बगल देत या प्रक्रियेला मदत केल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सामान्य नागरिकांची कामे महिनोनमहिने प्रलंबित राहतात, मात्र काही दिवसांत एवढ्या मोठ्या व्यवहारांची पूर्तता होणे आश्चर्यकारक असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून देण्यात येत आहे. पनवेल परिसरातील वाढत्या रिअल इस्टेट दरांचा फायदा घेत मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केल्याचा संशय व्यक्त होत असून या संपूर्ण प्रकरणातील आर्थिक व्यवहार, निधीचा उगम आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका याबाबत सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे.

## अनधिकृत शाळेतील विद्यार्थ्यांचे शासकीय शाळेत समायोजन करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात साधारण २२ अनधिकृत शाळा असल्याचे रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. यात अनेक विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

या अनाधिकृत शाळांची कृती ही बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणचा हक्क अधिनियम आणि शालेय शिक्षण विभाग व महिला व बाल विकास यांनी विद्यार्थी / बाळकांच्या सुरक्षा विषयक वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारे आहे. तसेच या अनधिकृत शाळामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची दखल घेत त्यांना तत्काळ नजीकच्या शासकीय आणि पालिकेच्या शाळांमध्ये समायोजन करण्याची मागणी डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड प्रहार जनशक्ती पक्ष यांनी गट शिक्षणाधिकारी पनवेल, आयुक्त पनवेल व महापौर पनवेल यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली असल्याची माहिती निवेदनद्वारे दिली आहे.

या शाळांमध्ये नियमांचे पालन होत नसल्याने बालकांच्या काळजी व संरक्षणाबाबत प्रश्न निर्माण होवून अनुचित प्रकार जबाबदार कोण ही परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून या अनधिकृत शाळाचे पाणी पुरवठा व लाईट कनेक्शन बंद करून संबंधित शाळेवर तातडीने कारवाई करण्यासह या शाळांवर नियमाप्रमाणे दंडात्मक व द्रव्यशुल्क भरण्याचे आदेश देणे, संबधित शाळा व त्यांचे संस्थाचालक यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी इतर प्रमुख मागण्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## सीकेटी कॉलेजमध्ये सोमवारी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये पदवी, पदव्युत्तर आणि विद्यावाचस्पती प्राप्त वर्षाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व प्रमुख पाहुणे म्हणून लखनऊ विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी कुलगुरू, सन्माननीय प्रो.डॉ. एस. बी. निमसे हे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व आमदार प्रशांत ठाकूर तसेच संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे माननीय सदस्य आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे. यावेळी चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील आणि विविध विभागांचे प्रमुख मंचावर मान्यवरांसोबत उपस्थित राहणार आहेत.

या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यामध्ये पदवी प्राप्त आणि विद्यावाचस्पती प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एन. परकाळे, परीक्षा नियंत्रक प्रो.डॉ.एस. आय. उन्हाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव हे विशेष परिश्रम घेत आहेत.



**पनवेल : महानगरपालिकेचे नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांचे पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या कोर कमिटीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील, संजय कदम, मंदार दोंदे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.**



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी मंगेश वाकडीकर निवड झाल्याबद्दल त्यांचे गुळसुंदे ग्रामपंचायत सदस्य सतीश साठे, सामाजिक कार्यकर्ते चिंतामण कडवे, बजरंग भागवत, सुनील पालकर आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

## 'इनरव्हील'चा हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट



**पनवेल : वार्ताहर**

इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेल क्लबने पनवेल येथील गुरुलिंगेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या मराठी शाळेत आवश्यक सुविधा सुधारण्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाच्या उद्देशाने 'हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेल क्लबने आयोजन केले.

या उपक्रमाने विद्यार्थ्यांसाठी एक चांगले आणि अधिक प्रोत्साहन देणारे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करून या प्रोजेक्टचे आयोजन केले गेले. क्लबच्या वतीने मराठी शाळेत विद्यार्थ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी वॉटर प्युरिफायर, शिक्षणाला चालना देण्यासाठी ग्रंथालयातील पुस्तके आणि 'मेरी किताब'ची १०० पुस्तके आणि वर्गात आरामदायक वातावरण निर्माण करण्यासाठी एक पंखा भेट दिला. शालेय साहित्य व्यवस्थित ठेवण्यासाठी एक कपाट उपलब्ध करून देण्यात आले.

जेवण बनवण्यास आणि स्वच्छतेस मदत करण्यासाठी १०-लिटरच्या कुकरसोबत ताट, चमचे आणि ग्लास भेट दिले. त्याचवेळी विद्यार्थ्यांना फ्रुटीचेही वाटप करण्यात आले. यावेळी क्लबच्या प्रेसिडेंट भूमिका परमार, सेक्रेटरी दिपा आडमुठे आणि इतर मेंबर उपस्थित होते.

## जेएनपीएत पीएसए ग्लोबल फीडर शिपिंगच्या जेजेएस सेवेचा प्रारंभ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीएने कंटेनर टर्मिनलपैकी एक असलेल्या पीएसए मुंबई येथे ग्लोबल फीडर शिपिंगच्या जेजेएस सेवेच्या प्रारंभाची घोषणा केली आहे. या सेवेचा शुभारंभ २४ मार्च २०२६ रोजी एमव्ही एसएसएफ डायनॅमिक या जहाजाच्या पहिल्या आगमनाने करण्यात आला.

नवीन सुरू करण्यात आलेल्या या सेवेअंतर्गत मुंद्रा -न्हावाशेवा - जेद्दाह - किंग अब्दुल्ला - सोखना - अकाबा - किंग अब्दुल्ला - जेद्दाह - मुंद्रा असा व्यापक बंदर रोटेशन समाविष्ट असून, यामुळे भारत आणि मध्यपूर्वेतील प्रमुख बंदरांदरम्यान सागरी संपर्क अधिक बळकट होणार आहे.

जेजेएस सेवेच्या प्रारंभामुळे सेवांची विश्वासार्हता वाढण्याची तसेच विशेषतः मध्यपूर्वेतील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर व्यापार प्रवाहांना अधिक स्थैर्य मिळण्याची अपेक्षा आहे. ही सेवा भारतीय निर्यातदार आणि आयातदारांना महत्त्वाच्या बाजारपेठांपर्यंत सातत्यपूर्ण प्रवेश सुनिश्चित करून पुरवठा



साखळीची लवचिकता अधिक बळकट करण्यास सहाय्य करता येईल.यापूर्वी या महिन्याच्या सुरुवातीला, पीएसए मुंबई येथे जर्मन ध्वजाखालील अल्ट्रा लार्ज कंटेनर व्हेसल (युएलसीव्ही) दमिएटा एक्सप्रेसचेही स्वागत करण्यात आले.

सुमारे २३ हजार ६६४ टीईयू क्षमता, अंदाजे ३९९-४०० मीटर लांबी आणि ६१ मीटर रुंदी असलेले हे जहाज जेएन पोर्टमधील कोणत्याही टर्मिनलवर लागलेले या प्रकारचे पहिलेच सर्वात मोठे जहाज ठरले आहे.

बंदर प्राधिकरण आपल्या जागतिक दर्जाच्या टर्मिनल ऑपरेटर्सच्या प्रयत्नांचे आणि बांधिलकीचे मनापासून कौतुक केले असून, त्यांच्या कार्यक्षमतेमुळे जेएनपीएला नवनवीन उंची गाठता येत आहे.

## शिवकर गावात हरित उपक्रमाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ह्युंदाई मोबिसने (Hyundai Mobis), महाराष्ट्र शासन आणि वर्ल्ड व्हिजन इंडियाच्या सहकार्याने "ग्रीन रिवाईव्हल पार्क" (Green Revival Park) या प्रकल्पांतर्गत एका परिवर्तनीय वनीकरण उपक्रमाचा यशस्वी शुभारंभ आणि हस्तांतरण केले. रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील शिवकर गावात हा सोहळा पार पडला. समुदायाच्या फायद्यासाठी एका दोलायमान शहरी हरित परिसंस्थेची निर्मिती केल्याबद्दल हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

"ग्रीन रिवाईव्हल पार्क" उपक्रमाचा उद्देश भारतातील निवडक ठिकाणी शाश्वत वनक्षेत्रे आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक जागा निर्माण करणे हा आहे. प्रत्येक ठिकाण १ ते २ एकर जमिनीचे एका भरभराटीच्या



हरित परिसंस्थेत रूपांतर करते, ज्यामुळे पर्यावरणीय लवचिकता आणि समुदायाचे कल्याण वाढते. रायगड व्यतिरिक्त, हा प्रकल्प इतर तीन ठिकाणी यशस्वीरित्या राबविण्यात आला असून, भारतातील विविध राज्यांमध्ये याचा पर्यावरणीय प्रभाव विस्तारला आहे. रायगडमध्ये विकसित करण्यात आलेल्या ग्रीन रिवाईव्हल पार्कमध्ये (हरित विकास उद्यान) १२,००० देशी झाडे आणि झुडपे आहेत, ज्यामुळे हरित क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे, हवेची गुणवत्ता सुधारली आहे आणि या भागातील पर्यावरणीय समतोल पुनर्संचयित झाला आहे. या जागेची रचना शाश्वत समुदाय इको-स्पेस म्हणून विचारपूर्वक केली गेली आहे, ज्यामध्ये मनोरंजनासाठी पायवाटा, विस्तीर्ण हिरवे लॉन, कचऱ्याचे नियोजन करणारे डबे, तलाव, विश्रांतीसाठी बाक आणि ऊर्जा-कार्यक्षम सौर दिवे आहेत. संपूर्ण परिसर प्लास्टिकमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे, जो पर्यावरणाप्रती जबाबदार पद्धती आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देतो. सातत्यपूर्ण देखभाल आणि शाश्वततेसाठी हे ग्रीन रिवाईव्हल पार्क आता समुदायाकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

शिवकर येथे झालेल्या या सोहळ्याला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि मोबिस इंडिया लिमिटेड, रायगडचे डेपो हेड सत्यजित भिटे, बीडीओ संजय वाठारकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, मोबिस इंडिया लिमिटेड यांच्यासह इतर शासकीय आणि ह्युंदाई मोबिसच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रमही झाला.

## उरण तालुक्यात राम जन्मोत्सव उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात उरण शहर, करंजा, नागाव, नवीन शेवा, फुंडे, चिर्ले, चिरनेर आदी गावात रामनवमी जन्मोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात पाण्यात आला. पहाटेच्या काकड आरतीसह प्रभू रामचंद्रांचा महाअभिषेक, राम जन्म आणि महापूजेच्या सोहळ्यासह ठिकठिकाणी भजन, कीर्तनाचे आयोजन करण्यात आल्याचे दिसत होते.



रामनवमी उत्सवानिमित्ताने गावागावातील राममंदिरात विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २६ मार्चला श्रीराम नवमी जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यात विविध धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. त्याचबरोबर उरण शहरातील रामनवमी उत्सवात गुजराती महिला सत्संग मंडळाचे भजन सादर करण्यात आले.

उत्सवात खाद्यपदार्थांसह लहान मुलांच्या खेळण्याचे साहित्य व हार फुले नारळाची दुकाने थाटण्यात आली होती.तर रात्री प्रभू रामचंद्राचा पालखीचा जल्लोष मिरवणूक सोहळा भक्तिमय आणि मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला.

## संपादकीय

# जागरूकता मोहिमेची गरज

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. राज्यात जादूटोणाविरोधी कायदा अस्तित्वात आल्यानंतरही इतक्या वर्षांनी असे प्रकरण घडते हे धक्कादायकच आहे. या भोंदूबाबाच्या आहारी निव्वळ सर्वसामान्य महिलाच नव्हे तर काही राजकीय नेते व सरकारी अधिकारीही गेल्याची चर्चा असल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. अर्थात, यात कोणालाही पाठिशी घातले जाणार नाही अशी निःसंदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली असून एसआयटीकडून वेगाने तपास सुरू असल्याचे दिसते.

**दैवी शक्ती, मंत्र-तंत्र आणि धार्मिक विधीच्या नावाखाली असंख्य महिलांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी रोज नवी माहिती उजेडात येते आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी विधानसभेत सविस्तर निवेदन केले आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास करण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्रमुखपदी महिला अधिकाऱ्याची नेमणूक केली. राजकीय नेत्यांशी असलेल्या संबंधांमुळे खरातसारखा भोंदूबाबा मोठा झाला असा आरोप विरोधकांकडून केला जातो आहे. पण याप्रकरणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठबळ देणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. कोणालाही पाठिशी घातले जाणार नाही असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. खरातवर आतापर्यंत आठ गुन्हे दाखल झाले आहेत. कितीतरी महिलांचे लैंगिक शोषण त्याने केल्याचे समोर आले आहे. त्याच्या मोबाइलची फोरेन्सिक तपासणी सुरू असून डिलिट केलेला डेटा परत मिळवला जातो आहे. खरातच्या संपर्कात कोण-कोण होते, त्यांच्यात काय व्यवहार झाले याची चौकशी होणार आहे. निरनिराळ्या सात-आठ गावांमध्ये कित्येक एकर जमीन, बंगला, शेतघर, विविध बँकांमध्ये खाती अशी एकूण 40 कोटींहून अधिकची मालमत्ता खरातकडे असल्याचे दिसते. पतीच्या मरणाची भीती घालून खरातने वारंवार बलात्कार केल्याची तक्रार एका महिलेने पोलिस ठाण्यात नोंदवल्यानंतर खरातवर गुन्हा नोंदवण्यात आला व याप्रकरणीच्या तपासाने वेग घेतला. दुर्दैवाने, महिला आयोगाच्या अध्यक्षा असलेल्या रुपाली चाकणकरच खरातसारख्या भोंदूला गुरू मानत असल्याचे व त्याची पाद्यपूजा करण्यात सहभागी झाल्याचेही समोर आले आणि चाकणकरांना पदाचा राजीनामा देणे भाग पडले. खरातने सुमारे दीडशेहून अधिक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे म्हटले जाते, परंतु सामाजिक अवहेलनेच्या भीतीपोटी अनेक पीडिता तक्रार द्यायला पुढे येत नसाव्यात. काही वृत्तवाहिन्यांनी व्हिडिओ व छायाचित्रांमधून पीडित महिलेची ओळख उघड केली. अशा वृत्तवाहिन्यांना नोटिसा बजावण्यात आल्या असल्या तरी याचाही परिणाम पीडितांवर झाला असावा. या प्रकरणात काही राजकीय नेते व अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा मुद्दा विरोधक लावून धरत आहेत. ज्यांच्या विरोधात पुरावे मिळतील त्या सर्वांची चौकशी होईल हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. परंतु फक्त कुणाचा फोटो कुणासोबत आहे एवढ्यावरून कुणाला आरोपी करता येणार नाही हेही त्यांनी म्हटले आहे. राजकीय नेत्यांच्या या प्रकरणातील सहभागाच्या आरोपांमुळे राज्यातील वातावरण मात्र ढवळून निघाले आहे. इतक्या गंभीर प्रकरणाचा वापर राजकीय शह-काटशहांसाठी मात्र अजिबात होता कामा नये. राज्यातील सर्वसामान्यांसाठी हे सारेच उद्वेगजनक आहे. बडे राजकीय नेते जर खरोखरच बुद्धी गहाण ठेवून अशा तांत्रिक-मांत्रिकांकडे जात असतील तर सामान्य जनतेने काय आदर्श घ्यावा? राज्यात नव्याने अंधश्रद्धा व जादूटोण्याच्या विरोधात जागरूकता मोहीम राबवण्याची गरज या प्रकरणामुळे दिसते आहे.**

# 'महालक्ष्मी सरस'च्या रंगतदार दुनियेत हरवलं मन



वाशीच्या सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये भरलेला 'महालक्ष्मी सरस' सोहळा आणि त्या सोहळ्याला दिलेली माझी कालची भेट केवळ एक फेरफटका नव्हता, तर ग्रामीण जिद्दीचा, स्त्रीशक्तीचा आणि स्वावलंबनाच्या प्रवासाचा जिवंत साक्षात्कार होता.

प्रदर्शनात पाऊल टाकताच जाणवलेली ऊर्जा वेगळीच होती. धुपबत्तीचा दरवळ, रंगीबेरंगी स्टॉल्स आणि गर्दीतूनही जाणवणारा आत्मविश्वास हे सगळं काही वेगळंच सांगत होतं. प्रत्येक स्टॉल हा केवळ विक्रीचा नव्हता, तर 'उमेद' आणि 'लखपती दिदी' या उपक्रमांतून उभ्या राहिलेल्या स्वप्नांचा आरसा होता.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केलेले विचार मनाला भिडणारे होते. 'उमेद' अभियान आणि 'लखपती दिदी' उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा मिळत आहे, ही बाब प्रत्यक्ष इथे अनुभवता आली. गावागावातून आलेल्या बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना इथे शहरी बाजारपेठ मिळत आहेही केवळ संकल्पना नाही, तर वास्तवात साकारलेली क्रांती आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजाता पाटील यांनीही व्यक्त केलेली भावना इथे प्रत्येक ठिकाणी जाणवत होती ती म्हणजे "महिला सक्षम झाली तर समाज आणि देश अधिक बळकट होतो." खरंच, इथल्या प्रत्येक महिलेमध्ये जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची प्रेरणा दिसत होती.

स्टॉल्सवर फिरताना राजश्री गणोरकर यांच्या धुपबत्त्यांपासून ते सिंधू कुंभार यांच्या मातीच्या कलाकृतींपर्यंत, प्रत्येक वस्तूमध्ये कष्टांची ऊब होती. शिल्पा सावंत यांच्या नैसर्गिक सौंदर्यप्रसाधनांमध्ये निसर्गाची साद होती, तर कांचन-योगिता पाटील यांच्या 'आजीची गोधडी'मध्ये मायेचा स्पर्श. हे सगळं पाहताना जाणवलंया वस्तू विकल्या जात नाहीत, त्या अनुभव म्हणून घरी नेल्या जातात.

खाद्यपदार्थांच्या विभागात तर महाराष्ट्राची चव खुलून दिसत होती. पूर्वा रणदिवे, कालिंदा सुरवसे, कांचन गजमल, उषा धुतारगाव यांसारख्या महिलांनी त्यांच्या कष्टातून तयार केलेल्या पदार्थांनी "घरगुती चव" आणि "विश्वास" या दोन गोष्टी एकत्र आणल्या होत्या.

या सगळ्या अनुभवामागे 'उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान'चे भक्कम कार्य उभे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी सांगितल्याप्रमाणे, २०११पासून सुरू झालेल्या या अभियानाने लाखो महिलांना स्वावलंबी बनवले आहे. आज राज्यातील सहा लाखांहून अधिक स्वयं सहायता समूह, हजारो ग्रामसंघ आणि लाखो कुटुंब या चळवळीचा भाग झाले आहेत. 'उमेद मॉल' आणि 'उमेद मार्ट'सारख्या संकल्पनांमुळे महिलांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध होत आहे हे या प्रदर्शनातून स्पष्ट जाणवत होते.

अवर सचिव धनवंत माळी यांनी दिलेली आकडेवारी या कार्याची भव्यता अधोरेखित करणारी आहेकोट्यवधी रुपयांचा पतपुरवठा, लाखो कुटुंबांचा सहभाग आणि हजारो उत्पादक गटांची निर्मिती ही केवळ संख्या नाही, तर उभारी घेतलेल्या आयुष्यांची साखळी आहे.

या प्रदर्शनात फिरताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली'सरस' म्हणजे बाजारपेठ नाही, तर परिवर्तनाचा उत्सव आहे. इथे प्रत्येक महिला 'लखपती दिदी' होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि तिच्या डोळ्यांत स्वप्नांबरोबर आत्मविश्वासही चमकत आहे.

२४ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत सुरू असलेल्या या 'महालक्ष्मी सरस' प्रदर्शनाला प्रत्येकाने आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन पुन्हा एकदा मनापासून करावेसे वाटते, कारण इथे केवळ खरेदी होत नाही, तर इथे स्वप्नांना हात दिला जातो, जिद्दीला सलाम केला जातो आणि 'सक्षम महिला, विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेचा जिवंत अनुभव घेतला जातो.

**-संजीवनी स.जाधव-पाटील,**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहित कार्यालय,
कोकण विभाग, नवी मुंबई

# जनभागीदारीच्या सहकार्याने क्षयरोगावर आपण करू शकतो मात!

क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आरोग्य प्रशासनाने ठोस पाऊल उचलले असून राज्य पूर्णपणे क्षयरोगमुक्त करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसांचे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे. दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो, जो नुकताच साजरा झाला.

क्षयरोग म्हणजे काय?

क्षयरोग हा Mycobacterium tuberculosis या जंतूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे, जो प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करतो, पण शरीराच्या इतर अवयवानाही बाधा करू शकतो. संक्रमित व्यक्ती खोकताना किंवा शिकताना हवेतून जंतू पसरतात आणि इतर व्यक्तीना संसर्ग होऊ शकतो.

**लक्षणे व ओळख**

खोकला दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहिल्यास त्वरित तपासणी करणे अत्यावश्यक आहे. सतत खोकला येणे. कफात रक्त येणे. ताप व रात्री घाम येणे. वजन कमी होणे. भूक न लागणे व अशक्तपणा. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास आजार गंभीर होऊ शकतो आणि इतरानाही संसर्ग होण्याचा धोका वाढतो.

**निदान व उपचार**

भारत सरकारच्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP) अंतर्गत क्षयरोगाचे निदान आणि उपचार मोफत उपलब्ध आहेत. क्षयरोग पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. डॉक्टरानी दिलेली औषधे नियमित आणि पूर्ण कालावधीसाठी घेणे अत्यावश्यक आहे. उपचार मध्येच सोडल्यास औषध-प्रतिरोधक क्षयरोग (Drug Resistant TB) निर्माण होऊ शकतो, जो अधिक धाकादायक असतो.

**प्रतिबंधात्मक उपाय**

खोकताना, शिकताना तोड व नाक झाकावे. मास्कचा वापर करावा. घरात स्वच्छ हवा व पुरेसे वायुवीजन ठेवावे. नवजात बालकांना BCG लस द्यावी. पोषक आहार व निरोगी जीवनशैली अंगी करावी.

**टीबीमुक्त भारताचे लक्ष्य**

भारताने 'टीबीमुक्त भारत' हे महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवले आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी शासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची सक्रिय भूमिका आवश्यक आहे. लवकरमा निदान, उपचारांचे पालन आणि समाजातील जागरूकता ही या लढ्यातील तीन महत्त्वाची शस्त्रे आहेत.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत AI Hand Held एक्सरे मशीन हे एक असे उपकरण आहे जे एक्स-रे प्रतिमां मधील क्षयरोग (टीबी) शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करते. AI Hand Held एक्सरे मशीन बॅटरीवर चालणारी आणि सुवाह्य असल्यामुळे त्यांचा वापर दुर्गम भागात करता येतो. या मशीनने एका वेळी जास्तीत जास्त १०० एक्स-रे काढता येतात. AI Hand Held एक्सरे मशीनद्वारे सन २०२५मध्ये ठाणे ग्रामीण अंतर्गत १५,५४१ नोंदणी करण्यात आली आहे.

क्षयरोग हा लपवण्याचा आजार नाही, तर उपचार करून पूर्ण बरा होणारा आजार आहे. लक्षणे दिसताच जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करा. उपचार पूर्ण घ्या आणि आपल्या कुटुंबाला व समाजाला सुरक्षित ठेवा. आपल्या सहकार्याने आपण निश्चितच क्षयरोगमुक्त समाज निर्माण करू शकतो. सर्वांनी मिळून क्षयरोगाविषयी गैरसमज दूर करूया, असे आवाहन ठाणे जिल्हा क्षयरोग केंद्र जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.दिनेश सुतार केले आहे.

(साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र)



## बदलते तंत्रज्ञान

### ...तर फेसबुक, इन्स्टाग्रामसाठीही केवायसी करावी लागणार

सोशल मीडियाचा चांगल्या कामांच्या तुलनेत वाईट कामांसाठीच जास्त वापर होऊ लागला आहे. विशेषतः महिला आणि मुलांच्या संदर्भात सोशल मीडियावर होत




असलेल्या गोष्टींबद्दल चिंता व्यक्त होत असून आता संसदीय समितीने केंद्र सरकारला महत्त्वाची शिफारस केली आहे. संसदीय समितीची शिफारस केंद्र सरकारने स्वीकारली, तर देशातील नागरिकांना सोशल मीडिया वापरण्यासाठी केवायसी करणे अनिवार्य होईल.

देशात सध्या अल्पवयीन मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवण्याची चर्चा सुरू आहे. कर्नाटकात याबद्दल हालचाली सुरू आहेत. त्यातच आता संसदीय समितीने केंद्रीय गृह मंत्रालय आणि माहिती तंत्रज्ञान विभागाला महत्त्वाची शिफारस केली आहे.

संसदीय समितीच्या अहवालानुसार सोशल मीडिया, डेटिंग्ज ॲप्स आणि गेमिंग प्लॅटफॉर्म या ठिकाणी वापरकर्त्यांची केवायसी केली जावी आणि त्याच्या वयाची पडताळणी होईल अशी व्यवस्था लागून करावी, असे म्हटले आहे.

सायबर गुन्हेगारी आणि महिलांची सायबर सुरक्षा यासंदर्भातील एक अहवाल संसदीय समितीने केंद्र सरकारला सादर केला आहे. याच अहवालात सोशल मीडिया वापरासाठी केवायसी करण्याची सूचना दिली गेली आहे.

समितीने म्हटले आहे की, बोगस अकाऊंट आणि अनोळखी नावाने होणारे शोषण रोखण्यासाठी सर्व प्रकारच्या डिजिटल प्लॅटफॉर्म्ससाठी केवायसी पडताळणी अनिवार्य करायला हवी. कंपन्यांनी विशिष्ट कालावधीनंतर वापरकर्त्यांची पडताळणी करायला हवी आणि ज्या अकाऊंटबद्दल सातत्याने तक्रारी येतात, त्यांच्या खात्यावर विशेष नजर ठेवली पाहिजे, असे या शिफारशीमध्ये संसदीय समितीने म्हटले आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मबरोबरच डेटिंग ॲप्स आणि गेमिंग प्लॅटफॉर्मबद्दलही कठोर परवाना नियमावली आणि वयाची पडताळणी करण्यासाठी कार्यप्रणाली तयार केली जावी. जेणेकरून महिला आणि अल्पवयीनांची होणारी फसवणूक आणि शोषण थांबवता येईल. याचे उल्लंघन करणाऱ्या प्लॅटफॉर्म्सवर भरपूर दंड आकारला जावा, असेही संसदीय समितीने म्हटले आहे.

# नाट्य-चित्रपट अभिनेते राजा गोसावी



## निमित्त

प्रसिद्ध मराठी नाट्य आणि चित्रपट अभिनेते राजाराम शंकर गोसावी यांना मराठी चित्रपटसृष्टीत 'विनोदाचा राजा' म्हणत असत. त्यांचा जन्म २८ मार्च १९२५ रोजी सातारा जिल्ह्यातील सिद्धेश्वर कुरोली (ता. खटाव) येथे झाला. त्यांचे प्राथमिक शालेय शिक्षण झाले होते. मेळे, गाणी, नकला आणि नाटके यांची त्यांना लहानपणापासूनच आवड होती. नाट्यअभिनेते बाळ गोसावी हे राजा गोसावींचे धाकटे बंधू होत.

सुरुवातीला राजा गोसावी गंगाधरपंत लोंढेंच्या राजाराम संगीत नाटक मंडळीत आणि दिग्दर्शक मास्टर विनायक यांच्या प्रफुल्ल पिक्चर्स या चित्रपटनिर्मिती संस्थेत लहानमोठी कामे करत होते. नंतर दामुअण्णा मालवणकरांच्या प्रभाकर नाट्य मंदिरात ते प्रॉम्प्टरचे काम करायला लागले. त्यांच्या भावबंधन या मराठी नाटकामध्ये त्यांना पहिल्यांदा रखवालदाराची भूमिका मिळाली. त्यानंतर या नाटकातील विविध व्यक्तिरेखा साकारण्याची संधी त्यांना मिळाली. पुण्यातील 'भानुविलास' या चित्रपटगृहामध्ये तिकीटखिडकीवर तिकिट विक्रेता म्हणून ते काम करत होते. १९५२मध्ये दत्ता धर्माधिकारी यांच्या अखेर जमलं या विनोदी चित्रपटामधून राजा गोसावींनी मराठी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले. त्याचवर्षी आलेल्या राजा परांजपे दिग्दर्शित लाखाची गोष्ट या चित्रपटामध्ये त्यांनी राजा परांजपे यांच्या मित्राची व्यक्तिरेखा साकारली. मुलीच्या वडिलांच्या एक लाख रुपये एका महिन्यात खर्च करून दाखवण्याच्या विचित्र अटीमुळे नायकाची आणि त्याच्या मित्राची होणारी तारांबळ यातून या चित्रपटात विनोदनिर्मिती करण्यात आली आहे. अडचणीत असलेल्या जिवलग मित्राला बाहेर काढण्यासाठी केलेली धडपड यात त्यांनी अचूक साकारली. यातील राजा गोसावींचा सहजसुंदर अभिनय चित्रपटाला पूरक ठरला. हे चित्रपट 'भानुविलास' चित्रपटगृहामध्ये लागले, तेव्हा एक दिवसाकरिता स्वतःच्याच चित्रपटाची तिकिटे त्यांनी विकली होती.

राजा गोसावींनी अनेक चित्रपटांत गंभीर भूमिका सहजरीत्या साकारल्या. मराठी रंगभूमीवरही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. उधार उसनवार (भीमराव वाघमारे), एकच प्याला (तळीराम), करायला गेलो एक (हरिभाऊ हर्षे), कवडीचुंबक (पंपूशेट), घरोघरी हीच बोंब (दाजिबा), डार्लिंग डार्लिंग (प्रभाकर), तुझे आहे तुजपाशी (श्याम), नटसम्राट (गणपतराव बेलवलकर), पुण्यप्रभाव (नुपुर, सुदाम, कंकण), प्रेमसंन्यास (गोकुळ), भाऊबंदकी (नाना फडणीस), भावबंधन (रखवालदार, महेश्वर, कामण्णा आणि धुंडीराज), याला जीवन ऐसे नाव (नाथा), लग्नाची बेडी (अवधूत, गोकर्ण), संशय कल्लोळ (फाल्गुनराव, भादव्या) इत्यादी अनेक सामाजिक, विनोदी आणि कौटुंबिक नाटकांमध्ये त्यांनी वेगवेगळ्या छटा असलेल्या भूमिका केल्या.

राजा गोसावी यांचा विवाह १९४९मध्ये झाला. त्यांच्या पत्नीचे नाव सुनंदा असून या दांपत्यास दोन मुली व तीन मुलगे आहेत. त्यांच्या मुलांनी लहानपणी हौशी रंगभूमीवर काम केले होते. त्यातील त्यांच्या शमा देशपांडे या कन्या हिंदी चित्रपट आणि मालिकांमध्ये अभिनेत्री म्हणून कार्यरत आहेत.

१९९५ साली अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान राजा गोसावी यांना मिळाला. नाट्य परिषदेने बालगंधर्व हा पुरस्कार देऊन त्यांच्या अभिनयाचा गौरव केला. राजा गोसावी यांचे पुणे येथे एका नाटकावेळीच हृदयविकाराचा झटका येऊन निधन झाले. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### ऊन लागल्याने चक्कर येत असेल तर करा तीन उपाय..

उन्हाळ्यात तापमान वाढलं की शरीरावर त्याचा थेट परिणाम होतो आणि अनेकांना चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे किंवा अचानक डोळ्यासमोर अंधारी येणे असे त्रास होतात. विशेषतः कडक उन्हात बाहेर फिरणारे, प्रवास करणारे किंवा पुरेसे पाणी न पिणारे लोक या समस्येला जास्त बळी पडतात. ही साधी चक्कर असली तरी काही वेळा ती उष्माघाताची (हीट स्ट्रोक) सुरुवातही असू शकते, त्यामुळे तिच्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते.



उन्हामुळे चक्कर येण्यामागे मुख्य कारण म्हणजे शरीरातील पाण्याची कमतरता आणि इलेक्ट्रोलाइट्सचे असंतुलन. खूप घाम आल्यामुळे शरीरातील मीठ आणि पाणी दोन्ही कमी होते. त्यामुळे रक्तदाब कमी होतो आणि मेंदूपर्यंत पुरेसा रक्तपुरवठा होत नाही, परिणामी चक्कर येते. यासोबतच खूप वेळ उपाशी राहणे, जाड कपडे घालणे किंवा बंद, गरम जागेत राहणे ही कारणेही चक्कर येण्यास कारणीभूत ठरतात.

अशा परिस्थितीत काही सोप्या गोष्टी लक्षात ठेवल्या तर उन्हामुळे चक्कर येणे टाळता येऊ शकते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भरपूर पाणी पिणे. दिवसातून वारंवार पाणी पिण्याची सवय ठेवावी. फक्त पाणीच नव्हे तर लिंबूपाणी, ताक, नारळपाणी यांसारखी पेये शरीरातील मीठ-पाण्याचे संतुलन राखण्यास मदत करतात. उन्हात बाहेर पडताना डोक्यावर टोपी, स्कार्फ किंवा छत्री वापरणे गरजेचे आहे. हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे घातल्यास शरीराला कमी उष्णता जाणवते.

शक्यतो दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळावे. बाहेर जायचेच असल्यास थोड्या-थोड्या वेळाने सावलीत विश्रांती घ्यावी. उपाशीपोटी बाहेर पडू नये आणि हलका, पौष्टिक आहार घ्यावा. फळे, केशिंबीर, पाण्याचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ खाल्ल्यास शरीर हायड्रेट राहते.

तरीही चक्कर आलीच, तर लगेच काही प्राथमिक उपाय करणे खूप गरजेचे असते. सर्वप्रथम त्या व्यक्तीला लगेच सावलीत किंवा थंड जागेत बसवावे किंवा झोपवावे. शक्य असल्यास पाय थोडे उंच ठेवावेत, त्यामुळे मेंदूपर्यंत रक्तपुरवठा सुधारतो. घट्ट कपडे न वापरता सैलसर वापरावेत जेणेकरून श्वास घेण्यास त्रास होणार नाही.

यानंतर त्या व्यक्तीला हळूहळू पाणी, लिंबूपाणी किंवा ओआरएस द्यावे. कपाळावर किंवा मानेला थंड पाण्याची पट्टी ठेवली तर शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होते. जर व्यक्तीला खूप अशक्तपणा वाटत असेल, उलटी होत असेल किंवा शुद्ध हरपल्यासारखे वाटत असेल, तर त्वरित डॉक्टरांकडे नेणे आवश्यक आहे.

# श्रीवर्धनमध्ये गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत

## नागरिकांच्या संयमामुळे इंधन भरण्यासाठी पंपावरही गर्दी नाही!

**श्रीवर्धन : बातमीदार**

आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती असल्यामुळे एलपीजी गॅसचा पुरवठा आपल्या देशाला कमी प्रमाणात होत असल्याच्या अफवा सर्वत्र उठत आहेत. अनेक ठिकाणी चार दिवस पेट्रोल व डिझेल मिळणार नाही. अशा अफवा उठल्यामुळे नागरिकांनी पेट्रोल पंपावरसुद्धा एकच गर्दी केल्याचे पाहायला मिळाले होते, परंतु श्रीवर्धन शहरात असलेल्या पेट्रोल पंपावरती नागरिकांची कुठल्याही प्रकारची गर्दी पाहायला मिळत नाही. कारण या ठिकाणी पेट्रोल व डिझेलचा पुरवठा सुरळीतपणे सुरू आहे.



त्याचप्रमाणे घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा देखील व्यवस्थितपणे सुरू असून गॅस मिळणार नसल्याच्या अफेमुळे नागरिकांनी गरज नसताना सुद्धा अतिरिक्त बुकिंग केल्यामुळे गॅस वितरणावरती ताण येत आहे, परंतु कोणीही नागरिक सिलेंडर पुरवठ्यापासून वंचित राहत नसल्याचे दिसून येत आहे. श्रीवर्धन शहरात सिलेंडरचा पुरवठा करणाऱ्या गाड्या सर्वत्र फिरताना दिसून येतात. मात्र गॅसचे बुकिंग नवीन नियमाप्रमाणे आता ज्या नंबरची डिलिव्हरी आपणाला मिळेल त्यापासून २५ दिवसानंतरच ऑनलाईन बुकिंग केले जात आहे. याबाबत श्रीवर्धन शहरातील एचपी गॅस वितरक रमेश कुमार आणि कंपनी यांच्याजवळ संपर्क साधला असता, त्यांच्याकडून देखील गॅसचा पुरवठा सुरळीत होत असल्याबाबत सांगण्यात आले.

कमर्शियल गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे कमर्शियल सिलेंडर उपलब्ध नाहीत. अजूनही तालुक्याच्या ग्रामीण भागातील अनेक नागरिक चुलीचा वापर करत असल्यामुळे सिलेंडरचा तितकासा वापर तालुक्यात होत नाही. केवळ चहा करणे किंवा एखादी वस्तू गरम करणे यासाठीच अनेक घरांमध्ये गॅसचा वापर केला जातो. अन्यथा भाकऱ्या, भात या गोष्टी चुलीवरच शिजवल्या जातात. सर्वत्र आंघोळीचे पाणी गरम करण्यासाठीदेखील चुलीचाच वापर करण्यात येतो.

श्रीवर्धन तालुक्यात पेट्रोल, डिझेल व गॅस याचा पुरवठा सुरळीतपणे सुरू असून शासनाकडे पर्याप्त साठा उपलब्ध आहे. त्यामुळे कोणीही पसरविलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# चौलमध्ये भाजपची कार्यशाळा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलमध्ये भाजप पक्षाची कार्यशाळेचे आयोजन करण्यात आहे, या कार्यशाळेत भाजपचे अलिबाग तालुक्यातील दक्षिण, मध्य, व उत्तर विभागातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला.



चौल येथील वसुंधरा कॉटेज येथे २७ व २८ मार्च रोजी दोन दिवशीय पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान २०२६ अंतर्गत भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांची कार्यशाळा सकाळी दहा वाजता प्रारंभ झाला.

या निमित्त भाजपचे दक्षिण जिल्हा सरचिटणीस अँड महेश मोहिते, भाजप जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा पाटील, भाजपचे नेते अ‍ॅड.आस्वाद पाटील, भाजप महिला जिल्हा उपाध्यक्षा अ‍ॅड.मनस्वी मोहिते, माजी जिल्हा अध्यक्ष हेमंत दांडेकर, जिल्हा उपाध्यक्ष संदिपभाई घरत, माजी तालुका अध्यक्ष उदय काठे, सतिश लेले, आदी प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थितीसह भाजपचे अलिबाग तालुका दक्षिण, मध्य व उत्तर मंडळ पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेस दक्षिण मंडळ अध्यक्ष अशोक वारगे, मध्य मंडळ अध्यक्ष रोशन भगत, उत्तर मंडळ अध्यक्ष केतन पाटील यांच्यासह चौलचे विश्वास जोशी, संकेत जोशी, तसेच दिलिप पटेल, माणिक बळी, मंदाताई बळी आदीने विशेष परिश्रम होते.

या कार्यशाळेत भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांना दि. २७ मार्च रोजी भाजपची कार्यपध्दती, कार्य विस्तार व दृष्टी, बुथ व्यवस्थापन व मन की बात, इतिहास व विकास, सोशल मिडिया व नमो अ‍ॅप या विषयी मार्गदर्शन तसेच दि. २८ मार्च रोजी वैचारीक अधिस्तान, केंद्र व राज्य सरकार योजन या विषयी मार्गदर्शन ठेवण्यात आले आहे. या कार्यशाळेत पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षक म्हणून मंगेश दळवी, यौवन चाफेकर, निलेश मोरे, आलाप मेहता, श्वेता ताडफळे, गिरीष तुळपुळे व हाजी कोठारी यांनी जबाबदारी स्विकारली होती.

या दोन दिवशीय पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान २०२६ प्रारंभ भाजपचे अ‍ॅड.आस्वाद पाटील, चित्राताई पाटील तसेच हेमंत दांडेकर, उदय काठे, संदिपभाई घरत, मंदाताई बळी आदीचे हस्ते दिपप्रज्वलनने तसेच चित्राताई पाटील यांचे हस्ते प्रतिमेचे पुजाअर्चा करून करण्यात आला.

# माजगाव येथे महाराजस्व समाधान शिबिरास प्रतिसाद

**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिप्रेत असलेल्या शेतकरी आणि सर्व सामान्य जनतेच्या हिताच्या योजना याची त्वरीत अंमलबजावणी करणे हाच उद्देश छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा आहे, याचा फायदा समाजाच्या शेवटच्या गरजू लोकांना होणे हा प्रमुख उद्देश आहे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी केले.



वासंबे महसूल मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर यांनी ग्रुप ग्रामपंचायत माजगाव येथील सामाजिक सभागृहात आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानात कार्यक्रमाचे प्रमुख उप विभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ बोलत होते.

यावेळी खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, रायगड जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, पंचायत समिती सदस्या प्रमिला पाटील, नायब तहसीलदार विकास पवार, यांचे संजय गांधी निराधार योजना नायब तहसीलदार तिहिरेकर, सरपंच सौ.पाटील, टाटा फाऊंडेशन भावेश रावळ, अ‍ॅड.राजेंद्र मढवी, खालापूर भूमी अभिलेख कार्यालय प्रमुख समाधान पाटील, सह अधीक्षक केंद्रे, अमोल वाघ, सामाजिक कार्यकर्ते व खालापूर लायन अध्यक्ष हभप.किशोर पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, ग्राम महसूल अधिकारी अभिजित हिवरकर, योगेश देशमुख, बलभीम लाटे, शुभम शेगोकार, तेजस देशमुख,सर्व कोतवाल, सेतू केंद्र,कर्मचारी त्यांच्या साथीदारांनी विशेष मेहनत घेतली.

## नागोठणे गवळआळीत साईबाबांचा उत्सव

**नागोठणे :** रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागोठणे येथील गवळआळीतील श्री साईबाबा मंदिरात गुरुवारी शिवसह्याद्री मित्रमंडळ गवळआळी व ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री साईबाबा उत्सव व भव्य पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरुवात सकाळी ८ वाजता नागोठणेचे माजी सरपंच तथा मंदिर विश्वस्त समिती अध्यक्ष विलास चौलकर व श्वेता चौलकर यांच्या हस्ते दुग्धाभिषेकाने झाली. यानंतर भाविकांसाठी साईभंडार (महाप्रसाद) आयोजित करण्यात आला. सायंकाळी ६ वाजता मंदिर विश्वस्त समिती अध्यक्ष विलास चौलकर यांनी साई पालखीस खांदा देऊन पालखी मिरवणुकीस सुरुवात केली. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी शिवसह्याद्री मित्रमंडळ व गवळआळी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# जीवना कोळी समाजातर्फे अखंड हरिनाम सप्ताह

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्री सद्गुरु अमृतनाथ स्वामी महाराज, श्री सद्गुरु स्वानंद स्वामी महाराज, श्री सद्गुरु प्रकाशनंद स्वामी महाराज तसेच महंत पुरुषोत्तम दादा पाटील देवाची आळंदी यांच्या कृपाआशीर्वादाने जीवना कोळी समाजात आयोजित ४९वा अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा अत्यंत भक्तिमय आणि मंगल वातावरणात पार पडला.

या पवित्र सोहळ्यात महंत पुरुषोत्तमदादा पाटील यांच्या ओजस्वी आणि रसाळ कीर्तनाने उपस्थित भाविकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. प्रभू श्रीरामाच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधत त्यांनी रामायणातील जीवनमूल्ये अतिशय साध्या, सोप्या आणि हृदयस्पर्शी शब्दांत उलगडली.

महंतांच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजरात दुमदुमला. शेकडो भाविक तल्लीन होऊन या भक्तीमय सोहळ्यात रंगून गेले होते. वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि समाधानाची अनुभूती दरवळत होती. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व भाविकांनी प्रेमपूर्वक महाप्रसादाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या परीक्षेत राजिपचे विद्यार्थी चमकले

**अलिबाग : प्रतिनिधी**

जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या २०२६–२७ शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश परीक्षेत रायगड जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या ८० जागांसाठी जिल्हा परिषद शाळांचे एकूण ३४ विद्यार्थी प्रवेशपात्र ठरले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अभिनंदन केले.

सराव परीक्षा, ‘विनोबा’ अ‍ॅपद्वारे चाचणी आणि मुल्यांकन तसेच प्रथम एज्यूकेशन फाऊंडेशनच्या ‘लर्निंग इंप्रूवमेंट प्रोग्राम’चा यात समावेश आहे. शिक्षण विभागातर्फे नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मार्गदर्शिकांची छपाई करून त्या शाळांना वितरित केल्या होत्या. यासोबतच शाळास्तरावरही विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळांतील ३४ विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालयासाठी प्रवेशपात्र ठरले आहेत. अर्वा चिखले, धैर्य नफे, वेदांत पाटील, सौरभ घुले, आयशा झा, इश्वरी भांगे, सोहम जाधव, आयुष जोगदंडे, ओम हरपुडे, साई भोईर, मानस चव्हाण, कुशल नारले, आरव पाटील, स्वरा जेवे, अक्ष करंजकर, कार्तिकी शिंदे, आरूष शिंदे, श्लोक मढवी, अक्षरा सुर्यवंशी, अभिजित शिंदे, दिपश्री बिरादार, मधुरा कोलवडकर, प्रतिक चिकणे, अभिनव एकशिंगे, अस्मिता मोरे, जितरत्न गायकवाड, आदित्य गिरीगोसावी, अनुश्री केरलकर, क्षितीज म्हात्रे, आराध्या लाड, आरूषी बोडखे, प्रार्थना ठमके, मंथन पत्रे, मानवी पवार या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची झाली निवड झाली आहे.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती **१. पद्मा बुध्या पाटील, २. यशोदा बुध्या पाटील, ३. रमेश बुध्या पाटील, ४. वसंत बुध्या पाटील, रा. मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड,** यांच्याकडून खालील मिळकत कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – चाणजे, तालुका – उरण, जिल्हा – रायगड**

| नोंद | सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|
| जासई | ६४/६ | ०.१०.०० हे. आर |

प्राप्त परिस्थितीवरून वरील नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये व कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार, मदर, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यू वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क / हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या आत** आपल्या हक्क व हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदपत्री पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांच्या पत्त्यावर लेखी कळवावे किंवा प्रत्यक्ष येऊन भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडूनही कोणतीही लेखी हरकत, तक्रार किंवा दावा प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क किंवा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७.०३.२०२६

**सही /–**
**ए. डी. इंजिनियस लॉ अँड असोसिएट्स**
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड – ४१०२०६
मोबाईल नं.: ८०९७११२८६३

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती **१. प्रभावती विठ्ठल थळी २. हिराबाई दत्ताराम म्हात्रे ३. कल्पना विवेक थळी ४. अर्चना सचिन थवई ५. प्रमोद अशोक म्हात्रे ६. शैला अशोक म्हात्रे, रा. मु. पो. चाणजे, ता. उरण, रायगड,** यांच्याकडून खालील मिळकत कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – चाणजे, तालुका – उरण, जिल्हा – रायगड**

| नोंद | सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|
| चाणजे | ३४४/४ | ०.१४.४० हे. आर |

प्राप्त परिस्थितीवरून वरील नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये व कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार, मदर, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यू वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क / हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या आत** आपल्या हक्क व हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदपत्री पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांच्या पत्त्यावर लेखी कळवावे किंवा प्रत्यक्ष येऊन भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडूनही कोणतीही लेखी हरकत, तक्रार किंवा दावा प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क किंवा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७.०३.२०२६

**सही /–**
**ए. डी. इंजिनियस लॉ अँड असोसिएट्स**
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड – ४१०२०६
मोबाईल नं.: ८०९७११२८६३

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती **१. रत्न प्रभा घरत २. अरविंद अनंता पाटील ३. जितेश अनंता पाटील ४. सुधाकर अनंता पाटील ५. कुसुम नारायण म्हात्रे ६. मनिष विजय म्हात्रे ७. वत्सला नारायण म्हात्रे ८. हिरकन्या विजय म्हात्रे ९. बबन अनंता पाटील १०. कुसुम जगदीश पाटील ११. विराज जगदीश पाटील अ पा क आई कुसुम पाटील, रा. मु. पो. चाणजे, ता. उरण, जि. रायगड,** यांच्याकडून खालील मिळकत कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – चाणजे, तालुका – उरण, जिल्हा – रायगड**

| नोंद | सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|
| चाणजे | ३४१/१ | १.३७.१० हे. आर |

प्राप्त परिस्थितीवरून वरील नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये व कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार, मदर, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यू वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क / हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या आत** आपल्या हक्क व हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदपत्री पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांच्या पत्त्यावर लेखी कळवावे किंवा प्रत्यक्ष येऊन भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडूनही कोणतीही लेखी हरकत, तक्रार किंवा दावा प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क किंवा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७.०३.२०२६

**सही /–**
**ए. डी. इंजिनियस लॉ अँड असोसिएट्स**
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड – ४१०२०६
मोबाईल नं.: ८०९७११२८६३

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given by Pradeep Kumar Sinha (Future Realty) for Environmental clearance for proposed residential cum commercial development on land bearing, plot No 1, Sector-3, Ulwe-Navi Mumbai-410206. has been accorded Environmental Clearance vide letter no EC25C3803MH5568913N (SIA/MH/INFRA2/563804/2026) dated 24th March, 2026 and copy of the clearance letter is available with https://parivesh.nic.in/.

## जाहीर सूचना

प्रदीप कुमार सिन्हा (फ्युचर रियल्टी) यांच्याकडून याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्लॉट नं. १, सेक्टर–३, उल्वे–नवी मुंबई– ४१०२०६ येथील भूखंडावर प्रस्तावित निवासी तथा व्यावसायिक विकासासाठी पर्यावरण मंजुरीकरिता, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या पत्र क्र. EC25C3803MH5568913N (SIA/MH/INFRA2/563804/2026) अन्वये पर्यावरण मंजुरी देण्यात आली असून, मंजुरी पत्राची प्रत https://parivesh.nic.in/ येथे उपलब्ध आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **ठकाबाई गोविंद घरत व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे विंधणे (५५३३२४)**
(PU–ID : १५२७९२९३३९४), तालुका–उरण, जिल्हा–रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७७/३ खाते क्रमांक : ११७४२ | २ | ०.४१.२० पो.ख. ०.०६.३० एकुण ०.४७.५० | ५.५६ |
| एकुण क्षेत्र ०.४७.५० गुंठयाचे खरेदीखत | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०३ /२०२६

**सही/–**
**अ‍ॅड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच. एस. भूखंड क्रमांक –३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

Adv. S.J. Sathe

## PUBLIC NOTICE

**IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE (S.D.) PANVEL, AT PANVEL**

Exh. 7/D
M. A. No. 365/2026

1. Smt. Anupama Vireshwar Joshi,
Age-59 years, Occ.- Nil,
R/at: Block no. 104, Apurva Apartment, near Ambemata Mandir,
Karjat, Raigad, Maharashtra 410201
Mobile Number

2. Shri. Shrikant Vireshwar Joshi,
Age-39 years, Occ.- Service,
R/at: Block no. 104, Apurva Apartment,
near Ambemata Mandir,Karjat, Raigad,
Maharashtra 410201 ....................... **Applicants**

**V/s.**

None .................................. **Opponent**

An application for grant of Heirship certificate has been filed by the applicants herein above due to sad demise of applicant no.1's husband and applicant no.2's father respectively Late Shri. Vireshwar Ganesh Joshi who died intestate at Kalyan, with respect to the immovable property mentioned in the 'Schedule of Property' herein below.

If any person/s except opponent have any objection for granting the Heirship certificate to the applicants, he/they should submit his/their written objection within 30 days from the date of publication hereof.

Failing which the Heirship certificate will be granted to the applicants and no such objection will be considered if filed after completion of the stipulated time period of 30 days

**SCHEDULE-I**

A Residential flat admeasuring area about 535 Sq. feet built up in the building known as "APURVA APARTMENT" within the jurisdiction of Karjat Municipal Council, Karjat, Dist. Raigad bearing CTS no. 174/24
Towards East : Road and beyond that Municipal reserved plot for Kotwal Gymnasium.
Towards West : Bhagat Chawl
Towards South : Ambe Mata Mandir
Towards North : Cinema Road and beyond that Mhada Plots

**SCHEDULE-II**

All that piece and parcel of non-agricultural land bearing C.T.S. No.740/1/C and building standing thereon a residential flat no. B/201, in wing "B" on Second floor in Yash Laxmi
Building No.2 admeasuring rera carpet area about 565 Sq. Feet within limits of Karjat Municipal Council.
On or Towards East : Partly by CTS No.691, 675, 740/2, 742
On or Towards West: Partly by Road and partly by Property of Shri Ambavane.
On or Towards South : CTS No.740/2
On or Towards North : CTS No.681 (S.No. 30A /1A / 1c).

Given under my hand and seal of this Court on 27 Day of March, 2026.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
सहाय्यक अधिक्षक (प्रशासन)
दि.न्या.व स्तर, पनवेल

# अनधिकृत बांधकामांवर हातोडा

## नेरूळ, कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरूळ विभागात व कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत राजेश दत्तात्रय पाटील, हाऊस नं. ८१६/२, सेक्टर-२०, नेरूळ गाव, नेरुळ, नवी मुंबई, यांचे अनधिकृतपणे बांधकाम सुरू असल्याने नेरूळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती.



नोटीसीला न जुमानता अनधिकृत बांधकाम सुरू ठेवल्याने नेरूळ विभाग कार्यालयामार्फत २४ मार्च २०२६ रोजी अनधिकृत बांधकाम निष्कासन मोहिमेचे आयोजन करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. सदर कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अनुराधा बाबर व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, ८ मजुर व १ जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यापुढेदेखील अशाप्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत अरविंद बाबाजी पोटे, एस.एस टाईप , रूम नं ६३१,सेक्टर-८, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये दिनांक १६ मार्च २०२६ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची अंशतः तोडक कार्यवाही करण्यात आली.

या अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/कर्मचारी व न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी ११ मजूरांचा व पिकअप व्हॅन ०१,०२ इलेक्ट्रॉनिक हॅमर, गॅस कटर ०१ चा वापर करण्यात आला. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# वाशीतील 'महालक्ष्मी सरस'ला प्रतिसाद

- एकाच छताखाली महाराष्ट्राची चव
- ४ एप्रिलपर्यंत शानदार मेजवानी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीच्या सिडको एक्झिबिशन सेंटर सध्या अक्षरशः 'हाऊसफुल्ल'चा आहे. 'महालक्ष्मी सरस' प्रदर्शनाने नवी मुंबईकरांना अशी भुरळ घातली आहे की, प्रत्येक दिवशी खरेदीसाठी लोकांची तुफान गर्दी उसळते आहे. ४९० स्टॉल्सवर 'शॉपिंग, टेस्टिंग आणि एक्सप्लोरिंग'चा भन्नाट अनुभव मिळत असून, मॉलपेक्षा वेगळं आणि मनाला भिडणारे असं काहीतरी शोधणाऱ्या मुंबईकरांसाठी हे प्रदर्शन हॉटस्पॉट ठरत आहे.

प्रदर्शनात पाऊल टाकताच दरवळणारा धुपबत्तीचा सुगंध, हाताने बनवलेल्या सौंदर्यप्रसाधनांची आकर्षकता आणि मातीपासून घडलेल्या कलाकृतींचा जिवंतपणा मन जिंकून घेतो. चांदूर बाजारच्या राजश्री गणोरकर यांच्या निर्मल्यापासून तयार झालेल्या धुपबत्त्या, साताऱ्याच्या शिल्पा सावंत यांच्या स्किन-फ्रेंडली प्रॉडक्ट्स आणि धाराशिवच्या सिंधू कुंभार यांचा मातीपासून लाखोंचा व्यवसाय या सगळ्या कथा मुंबईकरांना 'लोकलला ग्लोबल टच' देणाऱ्या वाटतात.

फॅशनप्रेमींसाठी इथे खास 'देशी विथ क्लासी' असा कलेक्शन आहे. कोल्हापूरच्या ऋता पेंढारकर यांचे मराठमोळे दागिने, अलिबागच्या वैष्णवी वैद्य यांची तांब्याला दिलेली गोल्डन फिनिश आणि 'आजीची गोधडी' बनवणाऱ्या कांचन-योगिता पाटील यांची हातमागाची जादू हे सगळे मुंबईकरांच्या स्टाईल स्टेटमेंटमध्ये नवा ट्विस्ट आणत आहे. सहा महिन्यांच्या मेहनतीतून तयार होणाऱ्या गोधड्या, ट्रेंडी लॅपटॉप बॅग्स आणि होम डेकोर आयटम्सना जबरदस्त डिमांड आहे.



या प्रदर्शनाची क्रेझ इतकी वाढली आहे की, मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांनीही इथे हजेरी लावत शॉपिंगचा आनंद घेतला. माधुरी पवार, जान्हवी किल्लेकर, अश्विनी महांगडे, नम्रता गायकवाड आणि ललित प्रभाकर यांनी 'सरस'चा अनुभव घेतला आणि या उपक्रमाचे कौतुक केले.

**वर्षभराची बेस्ट खरेदी करा इथेच**

२४ मार्चपासून सुरू झालेला हा 'सरस' सोहळा ४ एप्रिलपर्यंत रंगणार असून, या वर्षाची बेस्ट खरेदी इथेच!असा ट्रेंड मुंबईकरांमध्ये पाहायला मिळतो आहे. एकाच ठिकाणी गावाकडची अस्सल चव, ट्रेंडी फॅशन, हेल्दी प्रॉडक्ट्स आणि प्रेरणादायी स्टोरीज अनुभवण्याची ही संधी चुकवू नका. कारण इथे प्रत्येक वस्तू केवळ प्रॉडक्ट नाही, तर एका जिद्दीचा, मेहनतीचा आणि स्वप्नांचा प्रवास आहे.

# स्वच्छताकर्मींसाठी क्षमता बांधणी व विकास कार्यशाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

कचरामुक्त शहरांसाठी राष्ट्रीय क्षमता बांधणी आराखड्यात स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या प्रमुख क्षेत्रामध्ये नगरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी यांची क्षमता बळकट करण्यासाठी क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छताकर्मींसाठी विभागवार क्षमता बांधणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार आज २५ मार्च २०२६ रोजी महात्मा फुले भवन, सेक्टर ३, वाशी येथे तसेच समाज मंदिर हॉल, सेक्टर ७, घणसोली येथे सर्व पर्यवेक्षक आणि सर्व स्वचछताकर्मी (स्वच्छता दुत) यांची 'क्षमता बांधणी' अंतर्गत 'क्षमता विकास कार्यशाळा' ऑरनेट या संस्थेच्या सहयोगाने आयेजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस वाशी येथे त्या विभागातील व घणसोली येथे त्या विभागातील स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

दोन्ही ठिकाणी मिळून ५४० पर्यवेक्षक आणि स्वच्छताकर्मींनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. याप्रसंगी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प सेवानिवृत्त विशेष कार्य अधिकारी आनंद जगताप यांनी मार्गदर्शन केले. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या नियंत्रणानुसार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या माध्यमातून सर्वच विभागांमध्ये अशा प्रकारच्या क्षमता बांधणी व क्षमता विकास कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे.

# नवी मुंबई महापालिकेची जागतिक क्षयरोगदिनी जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त आज २४ मार्च रोजी क्षयरोगाविषयी व्यापक जनजागृती करणारे विविध उपक्रम नमुंमपा आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात आले. यामध्ये नमुंमपा शाळा क्र. ३६, कोपरखैरणे गाव शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाने क्षयरोग विषयक रॅलीचे आयोजन करण्यात आले.





रॅलीनंतर क्षयरोग विषयक जनजागृती करणारे पथनाटय सादर करून मुलांना क्षयरोगाविषयी शास्त्रीय माहिती सहजसोप्या पध्दतीने सांगण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण कटके, शहर क्षयरोग अधिकारी, डॉ. आरती सिंग गनवीर, वैदयकिय अधिकारी व मुख्याध्यापिका दिपाली संख्ये यांच्या उपस्थितीमध्ये हा विशेष कार्यक्रम झाला.

याचप्रमाणे नमुंमपा सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच रुग्णालयामध्ये पथनाटय सादर करण्यात आले. रोटरी क्लॅब ऑफ मिलेनियम सिटी यांचेमार्फत गरजू क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. क्षयरोगाविषयी जनजागृती करणारी पथनाट्ये प्राधान्याने वस्ती पातळीवर झोपडपट्टी व अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात आयोजित करण्यात आली.

या उपक्रमात लोकसहभागाच्या अनुषंगाने डॉ. डी.वाय.पाटील वैदयकिय महाविदयालय व तेरणा वैदयकिय महाविदयालय अंतर्गत रॅली, पोस्टर्स स्पर्धा, कॉन्फरन्स, पथनाटय, रुग्णांचे आरोग्य शिक्षण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २४ मार्च २०२६ पासून "टीबी मुक्त भारत अभियान – १०० दिवस अभियान" नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अति. आयुक्त श्री. सुनिल पवार तसेच वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्याचे संपूर्ण नियोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत अतिजोखमीच्या क्षेत्रातील लाभार्थ्यांना क्षयरोगाच्या लक्षणांबाबत विचारणा करून त्यांची एक्स – रेद्वारे तपासणी करण्यात येईल. तरी सर्व नागरिकांनी या अभियानांतर्गत नवी मुंबई महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसीस या जीवाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून याचा प्रसार श्वसनाव्दारे होतो. जगातील एकूण क्षयरुग्णांपैकी २५ टक्के क्षयरुग्ण हे भारतात आढळून येतात. भारतातील क्षयरुग्णांपैकी १० टक्के रुग्ण महाराष्ट्रात आढळून येतात.

जागतिक स्तरावरील शाश्वत विकास ध्येयानुसार सन २०३० अखेर क्षयरोगाचे दूरीकरण करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने देशात राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जागतिक स्तरावर दरवर्षी २४ मार्च हा दिवस क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यासाठी 'जागतिक क्षयरोग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जागतिक स्तरावर मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक असलेल्या क्षयरोगाकडे सर्वांच्या एकत्रित सहकार्याने लक्ष वेधण्यात येते. या दिनाचे औचित्य साधून क्षयरोगाविषयी व्यापक जनजागृती करण्याकडे विशेष लक्ष दिले जाते.

# एनएमएमएस परीक्षेत पिरकोन महाविद्यालयातील मुलींची बाजी

**उरण : बातमीदार**

केंद्र शासनाच्या आर्थिक दुर्बल घटकामध्ये मोडणाऱ्या शालेय विद्यार्थ्यां साठी एनएमएमएस परीक्षांचे नियोजन केले जाते. उरण पूर्व विभागातील कर्मवीर



भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातून एकूण १५ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते त्यापैकी १०विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यात १० पैकी ९ मुलींनी बाजी मारली तर मुला पैकी एकच विध्यार्थी उत्तीर्ण झाल्याने विद्यालयात मुलींनीच बाजी मारली आहे.

उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हे विद्यालय ग्रामीण भागात असून या विद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले आहेत. हे विद्यालय नसते तर या भागात अनेकांना शिक्षणाची दारे उघडली नसती. त्यामुळं हे विद्यालय या भागासाठी ठेवा आहे असेच म्हटले जाते.

या विद्यालयाच्या प्राचार्य ए.ए.पाटील विभाग प्रमुख एम.एस.पाटील , प्रा.डाढाळे बी.बी, एस.सी.पाटील, एस.आर.म्हात्रे, डी.आर.पाटील, सी. ए. घरत, वर्षा पाटील, एन.बी. कल्याणकर, पी.एम. पाटील या सर्व शिक्षकवृंदाचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्यानेच हे यश संपादन करू शकले, असे विद्यालयाचे चेअरमन जीवन गावंड यांनी सांगितले.



**पनवेल : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वाटचालीत योगदान दिल्याबद्दल नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत मढवी यांचा 'कोपसाप'च्या वर्धापन दिनानिमित्त कवी केशवसुत स्मारक मालगुंड (रत्नागिरी) येथे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात अध्यक्ष नमिता कीर, कार्याध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याबद्दल पनवेल येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रा.मढवी यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी कोमसापचे केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी तसेच ॲड. मनोज म्हात्रे, कवी गणेश म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, श्याम पुंडे, संजय गोडसे, भालचंद्र जुमलेदार, समीर वेश्वीकर आदी उपस्थित होते.**



# वाशी गावात रामनवमी उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वाशीगाव येथील स्व. प्रेमनाथ पाटील चौकातील प्रभाग क्र. १८ च्या भारतीय जनता पार्टी मुख्य जनसंपर्क कार्यालयात श्रीरामनवमी निमित्ताने दिवसभरात विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

नगरसेवक निशांत भगत, नगरसेविका प्रिती संदीप भगत व समाजसेवक संदीप करसन भगत यांनी प्रभु श्रीरामांच्या प्रतिमेचे पुजन केले.

सायंकाळच्या सत्रात वाशीगाव येथील नगरसेवक जनसंपर्क कार्यालयाजवळ हिंदू संमेलन समिती, वाशीगाव आयोजित हिंदू व हिंदुत्वासह संघ यात्रा या विषयावर हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. यात उपमहापौर दशरथ भगत हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते असे हिंदू संमेलन समिती अध्यक्ष भारत भगत यांनी कळविले.

विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, वाशी प्रखंड आयोजित श्रीरामनवमी निमित्त भव्य शोभारात्रेचे स्वागत वाशीगाव येथे करण्यात आले.

# सीबीडी बेलापूर येथे राष्ट्रीय सांख्यिकी प्रादेशिक कार्यालयातर्फे प्रशिक्षण शिबिर





**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी प्रादेशिक कार्यालयातर्फे प्रशिक्षण शिबिर बेलापुर येथे झाले. प्रादेशिक कार्यालयाच्या वतीने इन्कॉर्पोरेटेड सर्व्हिस सेक्टर एंटरप्रायझेसच्या वार्षिक सर्वेक्षणा संदर्भात प्रादेशिक प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन उपमहानिदेशक व प्रादेशिक प्रमुख पी ए. मिनी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी संचालक भाग्यश्री साठे, उपसंचालक रूपाली कर्णे, सहाय्यक संचालक राजगोपाळ कृष्णन तसेच ठाणे उपप्रादेशिक कार्यालयाचे सहाय्यक संचालक एच वी रभिदा उपस्थित होते.या प्रादेशिक प्रशिक्षण शिबिरात राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, मुंबई व ठाणे येथील १०० हून अधिक क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

उद्घाटनपर भाषणात पी. ए. मिनी यांनी सांगितले की, या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश देशातील कॉर्पोरेट सेवा क्षेत्राचा सर्वंकष डेटाबेस तयार करणे हा आहे. यामध्ये उद्योगांच्या आर्थिक, कार्यप्रणाली व रोजगारासंबंधित सविस्तर माहिती संकलित केली जाणार आहे. तसेच ही सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. या सर्वेक्षणाचे क्षेत्रीय कामकाज १ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी गुड्स आयन सर्विसेस टॅक्स नेटवर्क डेटाबेसच्या आधारे तयार करण्यात आलेल्या नमुना पद्धतीची माहिती दिली. ३१ मार्च २०२५ पर्यंत नोंदणीकृत सर्व सक्रिय सेवा व व्यापार उद्योगांचा समावेश करून सिंगल स्टेज पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणात सर्वेक्षणाच्या प्रश्नावली आणि कार्यपद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शन संचालक भाग्यश्री साठे यांनी केले.

# सामाजिक कार्यकर्त्या आरती बेहरा यांना पुरस्कार

**उरण : बातमीदार**

महिला दिनाचे औचित्य साधून स्टे फाईन ग्रुप ऑफ कंपनीज यांच्या वतीने आणि डीएस एंटरटेनमेंट (टीम दीपक शेट्टी) यांच्या नियोजनाखाली आयोजित 'नारी गौरव सन्मान २०२६' आणि 'हळदी-कुंकू सोहळा' मुंबईतील मुलुंड येथील महाकवी कालिदास नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडला.



राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक अशा विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या महिलांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. स्टे फाईन ग्रुप ऑफ कंपनीज (स्टेफाईन सुपरमार्ट) यांनी उत्तम आयोजन केले होते. उत्तम नियोजन व अंमलबजावणी दीपक शेट्टी टीम व डीएस एंटरटेनमेंट ने केले होते. कार्यक्रमाला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर महिला उपस्थित होत्या, ज्यात मीनाक्षी शिंदे (माजी महापौर), भक्तीताई भोसले, जयंती उल्लाल आणि माधुरी जे. सुतार यांचा समावेश होता.

ज्या महिलांनी आपल्या नेतृत्वाने आणि कार्यकर्तृत्वाने समाजासमोर आदर्श ठेवला आहे, अशा निवडक महिलांना 'प्राईड ऑफ विमेन अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने ॲड. प्राजक्ता नंदकुमार देशमुख आणि भारती शेवाळे, सारीका अष्टेकर, आरती बेहरा यांच्यासह इतर मान्यवर महिलांचा समावेश होता. या कार्यक्रमात नारी शक्ती संघटनेचे नॅशनल सेक्रेटरी ज्ञानेश्वर सोनावणे, माजी प्राचार्य अरुण घाग यांचीही विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन स्टे फाईन परिवाराचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुरजकुमार कुंभार, मोहिनी पुजारी, आणि प्रकाश दसूरी व जिग्रा भिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ पुरस्कार प्रदान न करता, सर्व उपस्थित महिलांसाठी 'हळदी-कुंकू' समारंभाचे आयोजन करून भारतीय संस्कृतीची जोपासना करण्यात आली. तसेच उपस्थित सर्व महिलांना स्टे फाईन परिवारातर्फे विशेष भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात महिला सामाजिक कार्यकर्त्या आरती बेहरा यांच्या कार्याचे, संघटनेचे कौतुक करत त्यांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आले. आरती बेहरा यांना पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पोलादपूर प्रभाग १मधील पोटनिवडणूक रखडली

## सावंतकोंड राहणार नगराध्यक्षपदापासून वंचित

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीच्या प्रभाग १मधील माजी नगराध्यक्ष सुनीता पार्टे यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेले महिला आरक्षणाचे नगरसेवकपद पोटनिवडणूक रखडल्याने अद्याप रिक्तच राहिले आहे. त्यामुळे सावंतकोंडच्या नशिबी या टर्ममध्ये महिला नगराध्यक्ष होण्याची संधीदेखील मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, प्रसाद इंगवले यांच्यानंतर उपनगराध्यक्षपदी मनोज प्रजापती यांची निवड झाल्यानंतर या टर्ममधील शेवटच्या नगराध्यक्षांचीही निवड येत्या महिन्यात होणार असल्याचे संकेत प्राप्त झाले आहेत.

पोलादपूर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीनंतरच्या पहिल्या पाच वर्षात शिवसेना सत्ताधारी असताना अश्विनी गांधी आणि सुनीता पार्टे या दोन महिला नगराध्यक्ष झाल्या. याचदरम्यान काँग्रेसचे नगरसेवक नागेश पवार यांनी शिवसेनेत प्रवेश करून पदाचा राजीनामा देत पोटनिवडणूक जिंकली. यामुळे नंतरच्या अडीच वर्षांमध्ये नामाप्र पुरुष नगराध्यक्षपदासाठी निलेश सुतार, नागेश पवार व राजेंद्र पवार यांना संधी देत पहिल्या टर्ममध्ये पाच नगराध्यक्ष करण्यात शिवसेना पक्षसंघटनेला यश आले.

दुसऱ्या टर्मच्या निवडणुकीसाठी पोलादपूर नगरपंचायतीचे पारंपरिक शिवसेना आणि काँग्रेस हे प्रतिस्पर्धी पक्ष सज्ज झाले. त्यावेळी सोनाली गायकवाड यांना नगराध्यक्षपदाची पहिली संधी मिळाली. त्यांचा राजीनामा घेऊन शिल्पा दरेकर यांना, तर त्यांच्यानंतर स्नेहल मेहता यांना नगराध्यक्ष होण्याची संधी मिळाली आहे. याचकाळात प्रसाद इंगवले हे उपनगराध्यक्ष असताना त्यांचा राजीनामा घेऊन मनोज प्रजापती यांची निवड उपनगराध्यक्षपदी करण्यात आली.

आता स्नेहल मेहता यांची सहामाही मुदत संपुष्टात येत असल्याने माजी उपनगराध्यक्ष स्व.उमेश पवार यांच्या समाजसेविका पत्नी अस्मिता पवार यांची नगराध्यक्षपदी निवड होणार असल्याचे संकेत प्राप्त झाले आहेत. यामुळे पवार आणि प्रजापती यांच्या कार्यकाळात पोलादपूर नगरपंचायत तिसऱ्या टर्मसाठी पंचवार्षिक निवडणुकीला सामोरे जाताना नामाप्र महिला थेट नगराध्यक्षपदाचीही निवडणूक होणार आहे.

दुसऱ्या टर्मच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये शिवसेना पक्षसंघटनेंतर्गत प्रभाग क्रमांक १मध्ये महिला आरक्षणावर पार्टेकोंडच्या माजी नगराध्यक्ष सुनीता पार्टे यांना पुन्हा उमेदवारी देण्यासंदर्भात नाराजी असल्याने शिवसेना पक्ष संघटनेने प्रभाग १मध्येच पार्टे यांचा राजीनामा घेऊन सावंतकोंडच्या महिला उमेदवारास अडीच वर्षांची संधी देण्याची तडजोड करण्यात आली, मात्र पार्टे यांचा राजीनामा घेऊन वर्ष लोटले तरी अद्याप प्रभाग क्रमांक १ची पोटनिवडणूक जाहीर झालेली नाही.


नगरपंचायत प्रशासनाकडून महाडसह राज्यातील अन्य नगरपालिका व नगरपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला, मात्र पोलादपूर नगरपंचायत प्रभाग १ची पोटनिवडणूक होण्यासाठी प्रयत्न केले नसल्याने अद्याप पोटनिवडणूक रखडली आहे. दुसऱ्या टर्मची पंचवार्षिक मुदत संपण्यासाठी सहा महिनेच शिल्लक असताना पोटनिवडणूक घेण्यासंदर्भात मतदारयादी निश्चित करण्यासह अन्य प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. यामुळे एकीकडे स्नेहल मेहता यांचा सहामाही कालावधी संपुष्टात येणार असताना दुसरीकडे प्रभाग क्रमांक १मध्ये पोटनिवडणूक होण्याची शक्यता वाढली आहे, पण या निवडणुकीत निवडून येणाऱ्या महिलेला नगराध्यक्षपदाची संधी मिळणार नसून निवडदेखील अल्पकाळासाठी ठरणार आहे.

आगामी तिसऱ्या टर्मसाठी पंचवार्षिक निवडणुकीला सामोरे जाताना नामाप्र महिला थेट नगराध्यक्षपदाचीही निवडणूक होणार असून पोलादपूर नगरपंचायतीमध्ये शिवसेनेमध्ये मोठया प्रमाणावर इनकमिंग होऊन आतापर्यंत नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष तसेच यापूर्वीच्या ग्रामपंचायतीमध्ये सरपंच व उपसरपंच आणि विविध राजकीय पक्षप्रमुख झालेल्यांच्या पत्नी तसेच नातेवाईकांना उमेदवारी करण्याची इच्छाशक्ती विविध कार्यक्रमांद्वारे दिसून येऊ लागली आहे. त्यामुळे शिवसेनेत थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीलाही पक्षसंघटनेच्या आदेशानुसार राजीनामा देऊन पाच वर्षांत तीन ते पाच थेट नगराध्यक्ष दिले जाण्याची शक्यता दिसून येत आहे.

पहिल्या टर्ममध्ये दोन महिला नगराध्यक्ष, दुसऱ्या टर्ममध्ये चार महिला नगराध्यक्ष, तर आगामी तिसऱ्या टर्ममध्ये पुन्हा थेट नामाप्र महिला नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. सक्षम महिला उमेदवार न दिल्यास त्यांच्या पतीनांच उचापती करताना पहावे लागणार आहे.

# कर्जत पंचायत समितीच्या सभेत नामकरणाचे ठराव मंजूर

**कर्जत : प्रतिनिधी**




कर्जत पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्य मंडळाची पहिली मासिक सभा नुकतीच झाली. या सभेत अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी पंचायत समितीच्या कार्यालयातील सभागृहाला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांचे नाव देण्याचा, तर चारफाटा येथील चौकाला कीर्तनकार मारुती महाराज राणे चौक असे नामकरण करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सभापती नमिता घारे यांच्या अध्यतेखाली झालेल्या या सभेला उपसभापती चित्रा ठाकरे, सभेचे सचिव गटविकास अधिकारी सुशांत पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. त्याचप्रमाणे सदस्य भगवान चंचे, महेश खारीक, नितीन धुळे, रेश्मा जोशी, कमलाबाई शिंगवा, कविता पादीर, अक्षय तिटकारे, महेश विरले, नमिता श्रीखंडे, सुषमा पवाळी यांच्यासह खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी सर्व खात्यांचा आढावा घेण्यात आणि त्यानंतर आयत्या वेळच्या विषयात यांनी दोन महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात आले. त्यात देशासाठी आपले प्राणाचे बलिदान देणारे मानिवली गावचे सुपुत्र हिराजी गोमाजी पाटील यांचे नाव पंचायत समिती कार्यालयातील सभागृहाला देण्याचा ठराव मांडला गेला. त्या ठरावाला सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

यानंतर कर्जत तालुक्यात आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करणारे कोकण दिंडीचे प्रणेते स्व. मारुतीमहाराज राणे यांचे नाव चारफाटा चौकाला देण्याचा ठराव मांडण्यात आला. त्या ठरावालाही सर्व सदस्यांनी अनुमती दर्शविली.

> **येथील पंचायत समितीमध्ये मंजूर झालेले मानिवली गावचे सुपुत्र हुतात्मा हिराजी पाटील आणि आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करणारे कोकण दिंडीचे प्रणेते स्व. मारुतीमहाराज यांचे नाव देण्याचे ठराव जिल्हा परिषदेच्या मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात येणार आहेत. तेथे प्रथम स्थायी समितीची मंजुरी घेतली जाईल आणि नंतर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यावर ठरावाची अंमलबजावणी होईल.**
> **–सुशांत पाटील,**
> गटविकास अधिकारी

# सुधागडात महिला शिक्षिकांचा एक दिवस माझा उपक्रम उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**



सुधागड तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह पाली येथे रायगड जिल्हा परिषद शाळेच्या प्राथमिक शिक्षिकांनी एक दिवस माझा या विशेष कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन केले होते. महिला शिक्षिकांमधील सुप्त गुणांना वाव देणारा आणि त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा हा सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यादेवता माता सरस्वती, राजमाता जिजाऊ, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि आई रमाई यांच्या प्रतिमा पूजनाने व स्वागतगीताने झाली. यावेळी जिल्हा परिषद सदस्य शर्मिला शरद बोडके, सुधागड पंचायत समितीच्या सभापती जागृती राजेश मानकर, सदस्य प्रणिता परदेशी, माजी सरपंच श्रद्धा कानडे, बौद्ध पंचायत महिला कमिटी अध्यक्ष अस्मिता कांबळे, रेश्मा गायकवाड, दीक्षा दंत आदी उपस्थित होत्या.

शिक्षण विभागातर्फे आयोजित विविध स्पर्धांमध्ये राज्यस्तरावर यश संपादन करणाऱ्या शिक्षिकांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये संगीता औताडे (शाळा दिघेवाडी) : शब्दकोडे निर्मिती स्पर्धा (राज्य चतुर्थ क्रमांक), शीतल पाटील (शाळा नवघर) : डॉक्युमेंटरी स्पर्धा (राज्य सातवा क्रमांक), रूपाली पांढरे (शाळा जांभूळपाडा) : थाळीफेक स्पर्धा (राज्य आठवा क्रमांक), भाग्यश्री हाके (शाळा माणगाव खुर्द) : गोळाफेक स्पर्धा (राज्य आठवा क्रमांक) तसेच विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल स्मिता सुजित जगताप (राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिका पुरस्कार २०२६), अर्चना गणेश साळुंके (राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ सन्मान पुरस्कार २०२६) आणि वृषाली मनोज गुरव (जिल्हा परिषद आदर्श शिक्षिका पुरस्कार २०२५-२६) यांचाही गौरव करण्यात आला. विभाग व तालुका स्तरावरील यशस्वी शिक्षिकांनादेखील यावेळी सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यात महिला शिक्षिकांनी सादर केलेल्या ग्रुप डान्सने उपस्थितांची मने जिंकली. मनोरंजक खेळांमध्येही शिक्षिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि विजयी स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. उमा उप्पार यांनी काढलेली मनमोहक रांगोळी आकर्षणाचे केंद्र ठरली. सूत्रसंचालन प्रज्ञा काळभोर यांनी केले, तर सर्वांनी जयश्री जाधव यांनी तयार केलेल्या भोजनाचा आस्वाद घेतला.

'एक दिवस माझा' ही संकल्पना स्मिता जगताप यांची होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जाधव, काळभोर, जगताप, मृणालिनी म्हात्रे, हूले, बाबर, गुरव, कडाळे, अश्विनी, सुर्वे, भोजकर, आघाव, पालवे आणि साळुंके यांनी केंद्र समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. खेळांचे नियोजन रूपा गाडेवार आणि सुनिता कडाळे यांनी केले.

या उपक्रमासाठी पंचायत समिती सदस्य सुनीता लेंडी आणि गटविकास अधिकारी लता मोहिते यांनी शुभेच्छा संदेश दिले.

## रोह्यात रंगणार कव्वालीचा सामना

**रोहा : प्रतिनिधी**

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शेख सलाऊद्दीन बाबा दर्ग्याचा उरूस सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावनेने साजरा होत आहे.

या उरूसनिमित्ताने देश परदेशातील नामवंत कव्वाल यांच्यात कव्वालीचा जंगी समना रंगणार आहे. भाविक आणि कव्वाल शौकिन मंडळींनी कार्यक्रमात उपस्थित राहून या उरूस आणि कव्वालीचा मनमुरादपणे आनंद लुटावे, असे आवाहन शेख सलाउद्दीन बाबा उरूस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# निजामपूर केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**



निजामपूर केंद्राची शिक्षण परिषद मांडवकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी संजय पालांडे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले ईशस्तवन व स्वागतगीत यामुळे वातावरण भारावून गेले. शिक्षक चव्हाण यांनी दिलेल्या ढोलकीच्या सुरेल साथीनं कार्यक्रमाला अधिक रंगत आली. मुख्याध्यापिका मगर मॅडम यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. NEPसह बदलत्या सर्व शैक्षणिक धोरणासाह परिषदेत विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

'निपुण महाराष्ट्र' या महत्त्वपूर्ण विषयावर शिवदेबाई यांनी मार्गदर्शन केले, तर 'नमुना पाठ' या विषयावर श्री. पोखरकर यांनी प्रभावी सादरीकरण केले. HPCसंदर्भात लीना मगर यांनी माहिती दिली तसेच इयत्ता चौथी शिष्यवृत्तीबाबत नम्रता बडे व इयत्ता सातवी शिष्यवृत्तीबाबत मिनल पोखरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यानुभव या विषयावर शिल्पा बांदल यांनी उपयुक्त माहिती मांडली.

याशिवाय उल्लास नवसाक्षर अभियान, विविध प्रशासकीय विषय, परिपत्रक वाचन, दाखलपात्र विद्यार्थी, आधार व अपार अपडेट यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर अध्यक्ष पालांडे सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ही परिषद शिक्षकांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

या परिषदेस निजामपूर केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी पोखरकर यांनी मांडवकरवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका मगर, सहशिक्षिका श्रीमती पाटील तसेच उपस्थित सर्व शिक्षकांचे आभार मानले. अध्यक्षांच्या परवानगीने शिक्षण परिषद यशस्वीरित्या झाल्याची घोषणा करण्यात आली.

# अनुसूचित जाती, नवबौद्ध विकास योजनांची जनजागृती

## पाली येथील वडेर हायस्कूलमध्ये पथनाट्य

**पाली : प्रतिनिधी**



राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विकास विशेष घटक योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी सध्या विशेष मोहीम राबवली जात आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून पालीतील ग.बा. वडेर हायस्कूल आणि व.ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालय येथे नुकतेच पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

शासकीय योजनांची क्लिष्ट माहिती सोप्या भाषेत समजून सांगण्यासाठी कलाकारांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजना, त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत आणि अटी यावर सविस्तर प्रकाश टाकण्यात आला.

केवळ भाषणातून माहिती न देता मनोरंजनासोबत प्रबोधन केल्यामुळे विद्यार्थ्यांना या योजनांचे महत्त्व चटकन समजले. जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन आपले शैक्षणिक भविष्य उज्वल करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरणार आहे.

# कुरूंदे येथे जत्रोत्सव

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील कुरूंदे येथील श्रीराम मंदिरात गुरुवारी सकाळपासून भावीकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. येथील यात्रेपासून तळा तालुक्यातील जत्रांना प्रारंभ होत असल्याने या जत्रेला तालुक्यात महत्त्व आहे.

भक्तगणांसोबत असलेल्या लहान मुलांचा कल खेळणी खरेदीकडे अधिक असला तरी पिपाणी, भोंगे घेऊन वाजवण्यातही मोठा आनंद ही मुले घेत होती तसेच नकली दागिने, बांगड्या, थंड पेय, भिंगऱ्या, इत्यादी साहित्य लहान मुलांसाठीचे उपलब्ध होते.

निसर्गरम्य अशा शांत व शीतल भागात असणाऱ्या या मंदिराकडे जाण्याचा रस्ता होण्याची मागणी भाविकांतून होताना दिसत होती. त्यामुळे रस्त्याबाबत नागरिक व भक्तगणांतून नाराजी व्यक्त करत असल्याचे ऐकावयास मिळाले.

या जत्रेला तालुक्यातील व तालुक्या बाहेरील भक्तगण येत असतात व दर्शन घेऊन आनंदी होतात. तळा शहरातील बारा वाड्यातील नागरिकांची येथे आवर्जून उपस्थिती असते.



# भाजप माथाडी व कामगार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी ओमकार मिरगुले



**माणगाव : प्रतिनिधी**

भाजप माथाडी व कामगार संघाच्या दक्षिण रायगड जिल्हाध्यक्षपदी ओमकार मिरगुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र अध्यक्ष आमदार शिवाजी पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी भाजप माथाडी व जनरल कामगार संघटनेचे सरचिटणीज दत्ता शिंदेदेखील उपस्थित होते.

ओमकार मिरगुले हे सामाजिक व संघटनात्मक कार्यात सक्रिय असून कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत भाजप माथाडी व कामगार संघटनेच्या दक्षिण रायगड जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# भाविक रामरंगी रंगले; रामनवमी उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**



मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मदिवस अर्थात रामनवमी रायगड जिल्ह्यात गुरुवारी (दि. २६) उत्साही आणि भक्तिमय वातावरणात साजरी झाली. या निमित्ताने ठिकठिकाणी विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर श्रीरामाचा जयजयकार सुरू होता.

सकाळपासूनच मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास श्रीराम जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी फुले उधळून टाळ-मृदंगाच्या गजरात रामनामाचा जयघोष करण्यात आला, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यानंतर महिलांनी आरती करून श्रीरामाचा पाळणा म्हटला. प्रसाद म्हणून सुंठवड्याचे वाटप करण्यात आले.

अलिबागच्या ब्राम्हण आळीतील श्रीराम मंदिरात ब्राह्मण उत्कर्ष मंडळातर्फे रामनवमी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यात महिलांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी महिलांनी श्रीराम जन्माचा पाळणा गायला. यानिमित्ताने डोंबिवली येथील स्नेहल पित्रे यांचे कीर्तन झाले.

जिल्ह्यात ठिकठिकाणच्या श्रीराम मंदिरांमध्ये भजन, कीर्तन पाठपूजा अशा धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले. मोठ्या जल्लोषात ठिकठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या. यासाठी वाहतूक व्यवस्थेत किरकोळ बदल करण्यात आला होता.

अलिबाग येथेही संध्याकाळी मिरवणूक काढण्यात आली. यात भगवे कपडे परिधान करून आणि हातात भगवे झेंडे घेऊन भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यामुळे वातावरण भारावून गेल्याचे दिसून आले. ढोल ताशांच्या गजरात भाविक तल्लीन होऊन नाचत होते. भाविकांनी दर्शनाबरोबरच महाप्रसादाचा लाभ घेतला. दिवसभर जिल्ह्यात श्रीरामाचा गजर सुरू होता. मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची आरास केली होती.

# साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील रणदिवे आळीमधील ॐ श्री साईबाबा मंदिराचा ३१वा वर्धापन दिन रामनवमी उत्सवादिवशी साजरा झाला. यानिमित्ताने सकाळपासून साईरामच्या जयघोषात साईबाबांच्या पादुका, प्रतिमेची व पोथीची मिरवणूक रणदिवे आळी ते होळीचा नाका ते साईबाबा मंदिरापर्यंत भक्तीमय वातावरणात काढण्यात आली.

यावेळी महिलावर्गाकडून साईंच्या पालखीचे स्वागत करुन पूजा-अर्चा करण्यात आली. भव्य मिरवणुक मोठ्या उत्साहात निघाली. तत्पूर्वी पहाटे ५.३० वाजता साईभक्त दत्ता भगत यांच्या हस्ते साईबाबांना दुधाचा अभिषेक करण्यात आला. तद्नंतर भक्तगणांनी अभिषेक घातला. सकाळी ८ ते ९ वाजेपर्यंत सात ठिकाणी घरी जाऊन भिक्षा मागण्यात आली. ९ ते १० वाजेपर्यंत श्री साई सत्यनारायणाची महापूजा झाल्यानंतर दुपारच्या सुमारास शेकडो भाविकांनी साई भंडारा महाप्रसादाचा लाभ घेतला.



### नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धा

# दिवा गाव ग्रामीणमध्ये, तर ऐरोली शहरी गटात विजेते

**नवी मुंबई : बातमीदार**

वयाच्या चाळीशीनंतर आजारपण येऊ नये याची काळजी घेतली जाते. अशावेळी क्रिकेटसारख्या भारतातील सर्वात लोकप्रिय खेळाच्या माध्यमातून शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त राहण्यासाठी मैदानात उतरणारे सर्वच खेळाडू कौतुकास पात्र असल्याचे मत व्यक्त करीत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी फोर्टी प्लस क्रिकेट स्पर्धेचे अंतिम सामने प्रथमतःच प्रकाशझोतात खेळविले जात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने स्व.राजीव गांधी क्रीडासंकुल सीबीडी बेलापूर येथे झालेल्या नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात महापौर सुजाता पाटील यांनी विजेत्यांसह सहभागी झालेल्या सर्वच खेळाडूंचे अभिनंदन केले.



त्यावेळी त्या बोलत होत्या.

पारितोषिक वितरण समारंभास क्रीडा, सांस्कृतिक कार्य व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, नगरसेवक सुरज पाटील, क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, कार्यकारी अभियंता विद्युत प्रवीण गाडे, ४०+ क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष मास्टर प्रदीप पाटील, उपाध्यक्ष नरेश गौरी, सचिव एल.डी. पाटील, सहसचिव विकास मोकल, खजिनदार मनोज म्हात्रे, भालचंद्र दळवी, माजी नगरसेवक जी.एस.पाटील, सीताराम मढवी व इतर मान्यवर उपस्थित होते.

ग्रामीण भागातील ३३ क्रिकेट संघांमध्ये झालेल्या स्पर्धेत दिवा गाव इलेव्हन संघाने बेलापूर गाव इलेव्हन संघावर मात करीत नवी मुंबई महापौर ४०+ क्रिकेट विजेतेपदाचा चषक पटकाविला. कोपरी गाव इलेव्हन आणि बोनकोडे गाव इलेव्हन यांना तृतीय क्रमांकाचा चषक प्रदान करण्यात आला. दिवागाव इलेव्हन संघातील किशोर पाटील यांना स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल मालिकावीर चषक प्रदान करण्यात आला. कोपरी गाव इलेव्हनचे योगेश भोईर सर्वोत्कृष्ट फलंदाज, बेलापूर गाव इलेव्हनचे उत्तम (ज्यु.) सर्वोत्कृष्ट गोलंदाज आणि बोनकोडे इलेव्हनचे योगेश तांडेल सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून मानकरी ठरले.

शहरी भागातील स्पर्धेत २५ संघ सहभागी झाले होते. त्यामध्ये युनाईटेड ऐरोली संघ विजेतेपदाचा तसेच रायझिंग स्टार ऐरोली संघ उपविजेतेपदाचा मानकरी ठरला. खारीगाव इलेव्हन संघाने तृतीय क्रमांक संपादन केला. युनायटेड स्पोर्ट्स ऐरोली संघातील खेळाडू जावेद शेख यांना मालिकावीर किताब देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे त्यांच्या संघातील खेळाडूंनी वर्गणी काढून त्यांना उत्तम कामगिराबद्दल रोख पारितोषिक देऊन सन्मानित केले. त्याचप्रमाणे, खारीगाव इलेव्हन संघाचे श्रीनिवास उत्कृष्ट फलंदाज, रायझिंग स्टार ऐरोली संघाचे सुनील केणी उत्कृष्ट गोलंदाज आणि युनायटेड स्पोर्ट्स ऐरोलीचे निलेश सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षकपदाचे मानकरी ठरले. विजेत्या संघांना मोठ्या आकारातील आकर्षक चषकासह संघातील प्रत्येक खेळाडूस वैयक्तिक स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

# रायगड जिल्हा कबड्डी संघांच्या सराव शिबिराला उत्साहात प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तयारीसाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पुरुष व महिला कबड्डी संघांच्या सराव शिबिराला पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली आहे. २६ मार्चपासून सुरू झालेले हे शिबिर ३१ मार्चपर्यंत खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे.

सिन्नर (जि. नाशिक) येथे २ ते ६ एप्रिलदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघाची सक्षम तयारी व्हावी या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले असून उद्घाटन आंतरराष्ट्रीय



कबड्डी प्रशिक्षक शरद कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, संघ व्यवस्थापक प्रमोद म्हात्रे, सचिन पाटील, मंदार मुंबईकर, जितू मेमी, पदाधिकारी, प्रशिक्षक व कबड्डीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सराव शिबिरामध्ये पुरुष संघातील १४ खेळाडू व दोम प्रशिक्षक तसेच महिला संघातील १४ खेळाडू व दोन प्रशिक्षक अशा एकूण ३२ जणांचा सहभाग असून सर्व खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण दिले जात आहे. खेळाडूंना तांत्रिक, शारीरिक व मानसिक पातळीवर सक्षम बनविण्यावर विशेष भर दिला जात आहे. शिबिरातील खेळाडूंसाठी निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली असून प्रत्येक खेळाडूस संपूर्ण स्पोर्ट्स किट्स श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने प्रदान करण्यात आले.

या शिबिरातून तयार होणारा रायगड जिल्हा कबड्डी संघ राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. शिबिर दररोज सकाळी ६ ते सकाळी ९ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत क्रीडांगणावर होत असून १ एप्रिल रोजी पुरुष व महिला कबड्डी संघ सिन्नर येथे रवाना होणार आहेत.

# वानखेडे स्टेडियमच्या ग्राउंड स्टाफला हार्दिक पांड्याने दिले ‘स्पेशल गिफ्ट’



**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेटच्या मैदानात षटकारांचा पाऊस पाडणारा हार्दिक पांड्या सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आहे. टी-२० वर्ल्डकप २०२६च्या विजयानंतर हार्दिकने दाखवलेल्या खिलाडूवृत्तीने सिद्ध केले आहे की, तो केवळ एक अष्टपैलू खेळाडूच नाही, तर शब्दाला जागणारा माणूसही आहे. वानखेडे स्टेडियमच्या त्या ‘पडद्यामागच्या’ नायकांसाठी हार्दिकने आपले वचन पूर्ण करत एक खास भेट दिली आहे.

टी-२० वर्ल्डकपच्या तयारीसाठी हार्दिक पांड्या गेल्या काही महिन्यांपासून मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर प्रचंड घाम गाळत होता. अनेकदा सराव करताना रात्रीचे १२ वाजत असत. यावेळी स्टेडियमचे ग्राउंडस्टाफ थकवा विसरून हार्दिकला साथ देत होते. तेव्हाच हार्दिकने या कर्मचाऱ्यांना एक शब्द दिला होता की, तुमच्या या कष्टाचे फळ मी तुम्हाला नक्की देईन.

हार्दिकने गुरुवारी वानखेडेवर जाऊन या सर्व ग्राउंडस्टाफची भेट घेतली आणि त्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरवले. हार्दिकने या कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत करत भेटवस्तू दिल्या. ज्यावेळी झगमगाटापासून दूर राहून हे कर्मचारी काम करतात, तेव्हा त्यांना स्टार खेळाडूने दिलेली ही पोचपावती भावूक करणारी ठरली.

# पांढरा चेंडू झाला गुलाबी!

### पीएसएलच्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानची फजिती

**लाहोर : वृत्तसंस्था**

पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि पाकिस्तानच्या क्रिकेट चाहत्यांकडून ही जगातील सर्वोत्तम क्रिकेट लीग आहे, असा दावा केला जातो, पण स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात पाकिस्तानी बोर्डाची फजिती झाल्याचे पहायला मिळाले आहे.

स्पर्धेतील पहिला सामना लाहोर कलंदर्स आणि हैदराबाद किंग्समेन या दोन्ही संघांमध्ये लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यात लाहोर कलंदर्स संघाने नाणेफेक जिंकून हैदराबाद किंग्समेन या संघाला गोलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले. या स्पर्धेत हैदराबाद संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी मार्नस लाबुशेनकडे



सोपवण्यात आली आहे. हैदराबादची गोलंदाजी सुरू असताना पांढरा चेंडू अचानक गुलाबी झाला. हे पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

चेंडूवरील चकाकी कायम ठेवण्यासाठी खेळाडू चेंडू आपल्या जर्सीला घासतात, पण पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेसाठी वापरण्यात येणाऱ्या जर्सीची क्वालिटी इतकी खराब आहे की, खेळाडूंनी चेंडू जर्सीला घासल्यामुळे जर्सीचा रंग चेंडूला लागला. त्यामुळे पांढऱ्या रंगाचा नवा चेंडू गुलाबी झाला. क्रिकेटमध्ये असे याधी कधीच घडले नव्हते, पण पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेत काहीही होऊ शकते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या लाहोर कलंदर्स संघाने २० षटकांअखेर सहा गडी बाद १९९ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या हैदराबाद किंग्समेन संघाचा डाव अवघ्या १३० धावांवर आटोपला. यासह लाहोरने हा सामना ६९ धावांनी आपल्या नावावर केला.

### नेटकऱ्यांच्या भन्नाट प्रतिक्रिया

या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे. दरम्यान नेटकऱ्यांनीही भन्नाट प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने लिहिले, “वेलकम टू पैसा शॉर्ट लीग. जर्सीची क्वालिटी इतकी खराब आहे की, चेंडू जर्सीला घासताच पांढरा चेंडू गुलाबी झाला. पाकिस्तान गुलाबी चेंडूने टी-२० लीग होस्ट करणारा पहिलाच देश बनला”; तर आणखी एका युजरने पोस्ट शेअर करत लिहिले की, “पाकिस्तान क्रिकेट लीग ही जगातील सर्वात मोठी भंकस लीग आहे.” या मजेशीर पोस्ट सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत.





पनवेल : भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या ५१व्या वाढदिवसानिमित्त भव्य कुस्त्यांचे जंगी सामने नुकतेच चिंध्रण येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. एकनाथ देशेकर आणि जि.प. सदस्य तथा महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष कमला देशेकर यांनी उपस्थित मान्यवरांना सन्मानित केले.




मुरूड : रामनवमीनिमित्त एकदरा येथे काढण्यात आलेल्या मिरवणुकीत स्थानिक कलाकारांनी पौराणिक वेषभूषा करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या कलेला नागरिकांनी दाद दिली. (छाया : सुधीर नाझरे)

# हंगामाच्या मध्यावर ‘एसआरएच’ला मिळणार पॅट कमिन्सची साथ

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या आधी पॅट कमिन्सबाबत एक महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. हा ऑस्ट्रेलियन अष्टपैलू क्रिकेटपटू पाठीच्या दुखापतीतून सावरत असून तो स्पर्धेतील सुरुवातीचे सामने खेळू शकणार नाही, मात्र सर्व काही सुरळीत पार पडल्यास आपण आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्यात आणि प्लेऑफमध्ये पुनरागमन करू शकू, अशी आशा त्याने व्यक्त केली आहे.

पॅट कमिन्स पाठीच्या दुखण्याने त्रस्त आहे. ॲशेस मालिकेत केवळ एक कसोटी सामना खेळल्यानंतर २०२६मध्ये एकही सामना खेळलेला नाही. तो २०२६च्या टी-२० विश्वचषकासाठी श्रीलंकेलाही गेला नव्हता. आयपीएल सुरू होण्यापूर्वी, कमिन्सने सांगितले होते की, तो स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि अंतिम सामन्यात नक्कीच खेळेल.



कमिन्सच्या अनुपस्थितीत सनरायझर्सने ऑरेंज आर्मीची सूत्रे इशान किशनकडे सोपवली आहेत. इशानने २०१६मध्ये गुजरात लायन्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. आता तो पहिल्यांदाच आयपीएल संघाचे कर्णधारपद भूषवणार आहे.

सनरायझर्स हैदराबाद आपला पहिला सामना २८ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळेल. हा हंगामातील सलामीचा सामना असेल, तर हैदराबाद संघाचा पहिला घरचा सामना ५ एप्रिल रोजी लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध होईल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com